cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–६ अंक–९१ रविवार दि.२१ जून २०२६ RNI No.: MAHMAR/2021/858 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### कर्नाटक विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजपला धक्का

कर्नाटक विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा निकाल जून २०२६ मध्ये जाहीर झाला आणि त्यात सत्ताधारी काँग्रेसने अपेक्षेपेक्षा अधिक यश मिळवत सातपैकी पाच जागा जिंकल्या. भारतीय जनता पक्षाला दोन जागांवर समाधान मानावे लागले, तर त्यांचा मित्रपक्ष जनता दल (सेक्युलर) अर्थात जेडी(एस) एकही जागा जिंकू शकला नाही. या निकालाने राज्यातील राजकीय समीकरणांबरोबरच भाजपच्या अंतर्गत संघटनात्मक स्थितीबाबतही अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

# युरियाची पहिली खेप भारताकडे रवाना

## होर्मुज सामुद्रीधुनी खुली झाल्याने शेतकऱ्यांना खत उपलब्ध होणार

दिल्ली । वृत्तसंस्था

**पश्चिम आशियातील संघर्षामुळे मागील काही महिन्यांपासून विस्कळीत झालेल्या खतपुरवठा साखळीला अखेर दिलासा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीत अडकून पडलेल्या युरियाच्या खेपांपैकी पहिली खेप भारताच्या दिशेने रवाना झाली असून ती पुढील सात ते नऊ दिवसांत देशाच्या पूर्व किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतपुरवठा पूर्वपदावर येण्याची आशा निर्माण झाली असून, शेतकऱ्यांची युरियाची मागणी पूर्ण करण्यास मोठी मदत होणार आहे.**



### आरसीएफची फेब्रुवारीतील निविदा

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स कंपनी म्हणजेच आरसीएफने फेब्रुवारी महिन्यात काढलेल्या खत आयात निविदेनुसार खरेदी केलेल्या युरियाची खेप घेऊन हे जहाज येत आहे. ही खेप मार्चच्या मध्यापर्यंत भारतात पोहोचणे अपेक्षित होते. मात्र पश्चिम आशियातील युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतुकीवर परिणाम झाल्याने जहाजांना तेथेच थांबावे लागले. आरसीएफने फेब्रुवारीच्या मध्यात काढलेल्या निविदेत १० लाख टन आयातीत युरिया खरेदीसाठी करार केले होते. या करारानुसार पश्चिम किनारपट्टीसाठी प्रति टन ५०८ डॉलर्स आणि पूर्व किनारपट्टीसाठी प्रति टन ५१२ डॉलर्स दराने पुरवठा करण्याचे ठरले होते. पहिल्या जहाजाने मार्गक्रमण केल्याने इतर जहाजांनाही मार्ग मोकळा होणार असून १५ जुलैपर्यंत सुमारे ३ लाख टन आयातीत युरिया भारतात दाखल होण्याची शक्यता सुत्रांकडून वर्तवली जात आहे.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारतासाठी खत घेऊन येणारी एकूण १६ जहाजे होर्मुझ सामुद्रधुनी परिसरात अडकून पडली होती. त्यामध्ये ३.३ लाख टन युरिया वाहून आणणारी आठ जहाजे, २.६ लाख टन डाय-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) घेऊन येणारी चार जहाजे, १.१ लाख टन सल्फरची वाहतूक करणारी तीन जहाजे तसेच अमोनिया घेऊन येणारे एक जहाज यांचा समावेश होता. या सर्व जहाजांना भारतात पोहोचण्यासाठी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### राजपत्रातील बेकायदेशीर तरतुदी रद्द करा–सपकाळ

मुंबईः सरकारी कारभारात पारदर्शकता असावी आणि त्याचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी काँग्रेसप्रणित युपीए सरकारने जनतेला ऐतिहासिक असा माहिती अधिकार कायद्याचा अत्यंत महत्त्वाचा अधिकार दिला आहे, पण सध्याच्या सरकारने मात्र नागरिकांना माहितीपासून दूर ठेवण्यासाठी अडथळ्यांची भिंत उभी केली आहे. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या राजपत्रात गंभीर कायदेशीर त्रुटी व मूळ कायद्याशी विसंगत तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामुळे नागरिकांचा माहितीचा अधिकारच काढून टाकण्याचा प्रयत्न केलेला असून यामुळे शासनाच्या पारदर्शकतेच्या तत्त्वालाही धक्का पोहोचत आहे. सरकारने तातडीने या बेकायदेशीर तरतुदी रद्द कराव्यात, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

### चालणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार–न्यायालय

नवी दिल्लीः नागरिकांना सुरक्षितपणे चालण्याचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा भाग असल्याचे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक रस्त्यावर सुस्थितीत पदपथ असणे आवश्यक असल्याचे महत्त्वपूर्ण मत व्यक्त केले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व रस्त्यांवर पदपथ अनिवार्य करणारा कायदा केंद्र सरकारने तयार करावा, अशी सूचनाही न्यायालयाने केली. शेजारच्या शाळेत जात असताना रस्त्यावर झालेल्या अपघातात पाच वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती ए. एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने म्हटले की, ''चालण्याचा अधिकार हा राज्यघटनेच्या भाग–३ अंतर्गत मूलभूत अधिकार आहे. तो कलम १९(१)(ड) अंतर्गत मिळालेल्या मुक्त संचाराच्या अधिकाराशी तसेच कलम २१ अंतर्गत जीवनाच्या अधिकाराशी निगडित आहे.

### एकनाथ शिंदेंचीच खरी शिवसेना–अमित शहा

कोल्हापूरः ऑपरेशन टायगरच्या मागे असलेल्या अमित शाह यांनी यासंदर्भात पहिल्यांदाच भाष्य करत आता एकच शिवसेना राहिली, असे मोठे वक्तव्य करत नाहीतर आधी शिंदे गट असं बोलावं लागत असायचे असे सांगत सूचक विधान केले. अमित शाह म्हणाले की, आधी एकनाथ शिंदेंच्या पाठी शिवसेना शिंदे गट असे बोलावे लागयचे. मात्र आता गट राहिला नाही, आता एकच शिवसेना राहिली असे म्हणत उद्धव ठाकरे यांना अप्रत्यक्ष टोला लगावला. आता कोणता गट राहिला नाही. आता एकच शिवसेना राहिली आहे असेही यावेळी ते म्हणाले.

# पवनराजे खटल्यातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता!

## पद्मसिंह पाटीलही सुटले, ओमराजे निंबाळकरांना सर्वात मोठा धक्का

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाला हादरवून सोडणाऱ्या आणि गेल्या दोन दशलकांपासून प्रलंबित असलेल्या बहुचर्चित पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा अखेर शनिवारी (२० जून २०२६) अंतिम निकाल लागला. या खटल्याचा संपूर्ण पाया ज्या माफीच्या साक्षीदारावर उभा होता, त्याची साक्ष पूर्णपणे अविश्वसनीय, संशयास्पद आणि विसंगत ठरल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपींची संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्तता केली आहे. हा निकाल खासदार ओमराजे निंबाळकर आणि निंबाळकर कुटुंबासाठी मोठा कायदेशीर धक्का मानला जात आहे.**

सीबीआय विशेष न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. आर. नावंदर यांच्या कोर्ट क्र. ५५ मध्ये ही ऐतिहासिक सुनावणी पार पडली. बिहारच्या तुरुंगात असलेला मुख्य शूटर पिंटू सिंग याला पोलिसांनी उशिरा हजर केल्यामुळे काही काळ सस्पेन्स वाढला होता. तो न्यायालयात हजर होण्याआधीच कडेकोट पोलीस बंदोबस्तात न्यायालयाने निकाल वाचनाला सुरुवात केली. न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी निकालपत्राचे वाचन करताना तपास यंत्रणांच्या ढिसाळ कारभारावर आणि पोलिसांच्या ▶▶ पान २ वर



### हे आरोपी झाले मुक्त

डॉ. पद्मसिंह पाटील (८६ वर्षे), सतीश मंदाडे, मोहन शुक्ला, शशिकांत कुलकर्णी, कैलास यादव, दिनेश तिवारी, पिंटू सिंग (मुख्य शूटर), छोटे पांडे.

### ओमराजेंचा विश्वासघात झाला – अनिल देसाई

या निकालानंतर ठाकरे गटाचे राज्यसभा खासदार अनिल देसाई यांनी बंडखोर खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याबाबत महत्त्वपूर्ण विधान करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. ओमराजे निंबाळकर यांचा विश्वासघात झाला आहे. त्यांना पुन्हा आमच्यासोबत यायचे असेल तर त्याबाबतचा अंतिम निर्णय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे घेतील, असे देसाई यांनी स्पष्ट केले.

### अशी घडली होती घटना

३ जून २००६ रोजी मुंबईहून पुण्याच्या दिशेने जात असताना नवी मुंबईच्या कळंबोलीत एक्सप्रेस हायवेवर धाराशिवचे विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांचे वडील पवनराजे निंबाळकर यांची कार अडवून अंदाधुंद गोळीबार करत हत्या करण्यात आली होती. या हल्ल्यात त्यांचा चालक समद काझी याचाही मृत्यू झाला होता. सीबीआयने या प्रकरणात २५ लाखांची सुपारी देऊन हत्या घडवून आणल्याचा आरोप माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यावर ठेवला होता. मात्र, तब्बल २० वर्षांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर शनिवारी सीबीआय कोर्टाने सर्व ८ आरोपींची निर्दोष सुटका केल्याने या प्रकरणाला अत्यंत अनपेक्षित कलाटणी मिळाली आहे.

## पीएम किसानचा २३ वा हप्ता बँकेत जमा, ९.४४ कोटी शेतकऱ्यांना लाभ



कोलकाता । वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २० जून) पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २३ व्या हप्त्याची रक्कम देशातील कोट्यवधी पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केली. पश्चिम बंगालच्या हुगली जिल्ह्यातील तारकेश्वर येथून पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पीएम किसान उत्सव दिनाच्या निमित्ताने २ हजार रुपयांचा हप्ता थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे जमा करण्यात आला. या हप्त्याच्या रुपाने सुमारे ९.४४ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात १८,८८० कोटी रुपये वितरित करण्यात आले.

आतापर्यंत २२ हप्त्यांमधून शेतकऱ्यांना सुमारे ४.२८ लाख कोटी रुपये अर्थसाह्य देण्यात आले आहे. आता या योजनेच्या २३ व्या हप्त्याचे पैसे शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत. या हप्त्याचा २ कोटी १८ लाखांहून अधिक महिला शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. ▶▶ पान २ वर

# हनुमान मंदिराचा सभामंडप कोसळून ७ भाविकांचा मृत्यू

## मानवत जवळील यशवाडीत मोठी दुर्घटना, अनेक गंभीर जखमी

परभणी । प्रतिनिधी

मानवत–परभणी राष्ट्रीय महामार्गावरील कोल्हा शिवारात असलेल्या यशवाडी येथील प्रसिद्ध त्रिमूर्ती हनुमान मंदिराला संपूर्ण परभणी जिल्हा तसेच मराठवाड्यात विशेष धार्मिक महत्त्व आहे. दर शनिवारी या जागृत देवस्थानात मारुतीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची मोठी गर्दी होत असते. शनिवार, २० जून २०२६ रोजी सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी वर्दळ होती. दुपारी ३ वाजेच्या सुमारास मंदिरात सुरू असलेल्या सभामंडपाच्या बांधकामाचा स्लॅब अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या भीषण दुर्घटनेत ७ भाविकांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला असून, २० ते २५ भाविक ढिगाऱ्याखाली चिरडून गंभीर जखमी झाल्याचे समोर आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य मंदिरासमोरील गाभारा आणि सभामंडपाच्या विस्तारीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या नव्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर दगडी पिलर आणि छतासाठी जड दगडांचा वापर केला जात होता. दुपारी ३ वाजेच्या सुमारास अनेक भाविक सभामंडपात ▶▶ पान २ वर

# अयोध्येतील राम मंदिराच्या देणगीत ८० टक्के घट

## वादाचा परिणाम; चोरीमुळे भक्तांचा संताप

अयोध्या । वृत्तसंस्था

**अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यावेळी कारण आहे मंदिरातील देणगीशी संबंधित कथित गैरव्यवहार प्रकरण. या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच मंदिरात येणाऱ्या देणगीच्या रकमेत मोठी घट झाल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे रामभक्तांमध्ये चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



मंदिराशी संबंधित सूत्रांच्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांपर्यंत दरमहा सरासरी सुमारे ७ कोटी रुपयांची देणगी मंदिराला मिळत होती. मात्र अलीकडच्या काळात ही रक्कम घटून सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत आल्याचे सांगितले जात आहे. हे आकडे खरे ठरल्यास देणगीत जवळपास ८० टक्क्यांची घट झाल्याचे चित्र आहे. राम मंदिर हे कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे केंद्र मानले जाते. त्यामुळे मंदिरातील देणगी ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४७.५० क्विंटल | २,३०० | २,५५१ | २,३७७ |
| ज्वारी/हायब्रिड: ४४.०० क्विंटल | २,००१ | ३,२९१ | २,५२७ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : ९.५० क्विंटल | ७,४१५ | ७,४१५ | ७,४१५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,४०२ | २,७९६ | २,५९३ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ४,३०१ | ५,४५० | ५,१०२ |

# आषाढी यात्रेसाठी एसटीच्या साडेपाच हजार विशेष बस

## राज्यभरातून करणार व्यवस्था–प्रताप सरनाईक



मुंबई । प्रतिनिधी

**पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी एसटी महामंडळाने ५ हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे. राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक पुढे बोलताना म्हणाले की, आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार असल्याचेही यावेळी सांगितले. प्रताप सरनाईक म्हणाले की, मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने–आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे. वारीदरम्यान रात्रंदिवस सेवा बजावणारे चालक, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# कर्नाटक विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजपला धक्का

कर्नाटक विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा निकाल जून २०२६ मध्ये जाहीर झाला आणि त्यात सत्ताधारी काँग्रेसने अपेक्षेपेक्षा अधिक यश मिळवत सातपैकी पाच जागा जिंकल्या. भारतीय जनता पक्षाला दोन जागांवर समाधान मानावे लागले, तर त्यांचा मित्रपक्ष जनता दल (सेक्युलर) अर्थात जेडी(एस) एकही जागा जिंकू शकला नाही. या निकालाने राज्यातील राजकीय समीकरणांबरोबरच भाजपच्या अंतर्गत संघटनात्मक स्थितीबाबतही अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

विधान परिषदेच्या सात जागांसाठी १२ जून २०२६ रोजी मतदान झाले. विधानसभेतील संख्याबळाच्या आधारे काँग्रेसला चार जागा सहज मिळतील, तर भाजपला दोन आणि जेडी(एस)ला एक जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर काँग्रेसने पाचवी जागाही जिंकली. या विजयामागे विरोधी पक्षातील काही आमदारांचे कथित क्रॉस व्होटिंग निर्णायक ठरल्याचे वृत्त समोर आले. त्यामुळे हा निकाल केवळ निवडणुकीचा आकडा नसून राजकीय संदेश देणारा ठरला. मे २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने २२४ सदस्यीय सभागृहात १३५ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते. भाजपला ६६ जागा मिळाल्या, तर जेडी(एस) १९ जागांवर मर्यादित राहिला. त्यानंतर काँग्रेस सरकारने अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आणि राज्यातील सत्ता मजबूत केली. विधान परिषद निवडणुकीतील यश हे त्या राजकीय व संघटनात्मक बळकटीचेच प्रतिबिंब मानले जात आहे. दुसरीकडे, भाजपसाठी हा निकाल चिंताजनक आहे. पक्षाला अपेक्षित दोन जागा मिळाल्या असल्या तरी जेडी(एस)ला मिळू शकणारी जागा काँग्रेसच्या खात्यात गेली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे क्रॉस व्होटिंगच्या आरोपांमुळे भाजपच्या अंतर्गत शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने तातडीने राज्यातील वरिष्ठ नेत्यांना दिल्लीला बोलावून परिस्थितीचा आढावा घेतल्याचे वृत्त आहे. कथित बंडखोरांवर कारवाईची शक्यताही व्यक्त करण्यात आली. लोकशाही व्यवस्थेत पक्षशिस्त आणि संघटनात्मक एकता यांना मोठे महत्त्व असते. विशेषतः अप्रत्यक्ष निवडणुकांमध्ये प्रत्येक मताचे राजकीय वजन अधिक असते. अशा परिस्थितीत क्रॉस व्होटिंग घडणे म्हणजे केवळ गणितातील चूक नसून संघटनात्मक कमकुवतपणाचे संकेत मानले जातात. भाजपने गेल्या दशकात कर्नाटकमध्ये स्वतःला प्रमुख राजकीय शक्ती म्हणून उभे केले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाने राज्यातील २८ पैकी २५ जागा जिंकल्या होत्या. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही भाजप-जेडी(एस) आघाडीने चांगली कामगिरी केली. अशा पार्श्वभूमीवर विधान परिषद निवडणुकीतील हा धक्का पक्षासाठी आत्मपरीक्षणाची संधी आहे. काँग्रेससाठी मात्र हा निकाल आत्मविश्वास वाढवणारा आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने राज्यातील सत्तेवरील पकड अधिक मजबूत केल्याचे दिसून आले. विशेषतः अतिरिक्त पाचवी जागा जिंकणे हे विरोधी पक्षातील मतभेदांचा राजकीय लाभ काँग्रेसने कसा घेतला, याचे उदाहरण ठरले आहे.तथापि, कोणत्याही निवडणुकीचा निकाल अंतिम सत्य नसतो. भारतीय राजकारणात जनमत सतत बदलत असते. विधान परिषद निवडणूक ही मर्यादित मतदारसंख्येची निवडणूक असते; त्यामुळे तिच्या निकालावरून व्यापक लोकमताचा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र पक्षांतील अंतर्गत वातावरण, नेतृत्वावरील विश्वास आणि संघटनात्मक शिस्त यांचे संकेत या निवडणुकांतून नक्कीच मिळतात. भाजपने या निकालाकडे केवळ पराभव किंवा धक्का म्हणून पाहण्याऐवजी संघटन मजबूत करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. दुसरीकडे, काँग्रेसने या यशामुळे अति आत्मविश्वासात न जाता जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यावर भर दिला पाहिजे. कारण अखेरीस कोणत्याही पक्षाचे राजकीय भवितव्य विधान परिषदेतल्या आकड्यांपेक्षा जनतेच्या विश्वासावरच अवलंबून असते. कर्नाटक विधान परिषद निवडणुकीचा २०२६ चा निकाल हा एका राज्यापुरता मर्यादित नसून राष्ट्रीय राजकारणालाही संदेश देणारा आहे. सत्ताधारी काँग्रेसला मिळालेले अतिरिक्त यश आणि भाजपमधील कथित क्रॉस व्होटिंग यांनी राजकीय चर्चांना नवे वळण दिले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निकाल दोन्ही पक्षांसाठी महत्त्वाचा धडा ठरेल, यात शंका नाही.

# पोलीस अधीक्षकांच्या 'तक्रार निवारण दिनाला' उत्स्फूर्त प्रतिसाद; २०२ प्रकरणांचा निपटारा



**जालना | प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबिर सिंह संधू यांनी सुरू केलेल्या 'तक्रार निवारण दिन' उपक्रमाला नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून प्रलंबित तक्रारींचा वेगाने निपटारा होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शुक्रवारी (दि. २० जून) जिल्हाभरात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेदरम्यान एकूण २०२ तक्रारी व अर्जांचा यशस्वी निपटारा करण्यात आला.**

नागरिकांच्या प्रलंबित अर्ज व तक्रारींचे तत्काळ निराकरण व्हावे या उद्देशाने जालना जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्तरावर सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत विशेष 'तक्रार निवारण दिन' आयोजित करण्यात आला होता. या मोहिमेत नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेण्यात आल्या तसेच अनेक प्रकरणांमध्ये जागेवरच तोडगा काढण्यात आला. मोहिमेचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी विविध पोलीस ठाण्यांना भेटी देत नागरिकांशी संवाद साधला आणि प्रलंबित अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यामध्ये पोलीस अधीक्षक तेगबिर सिंह संधू यांनी सेवली पोलीस ठाण्यात, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्यात, तर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी जालना, तीर्थपुरी, आष्टी आणि भोकरदन पोलीस ठाण्यांमध्ये उपस्थित राहून मोहिमेचे संनियंत्रण केले. जिल्हा पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आजच्या मोहिमेत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये प्रलंबित असलेल्या १८७ स्थानिक अर्जांचा तसेच वरिष्ठ स्तरावरील १५ अर्जांचा निपटारा करण्यात आला. अशाप्रकारे एकूण २०२ अर्ज व तक्रारींचे समाधानकारक निराकरण करण्यात आले. नागरिकांना जलद, पारदर्शक आणि प्रभावी पोलीस सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, भविष्यातही अशा मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शहरतील गुंडगिरीचा बिमोड करण्यासाठी त्यांना संरक्षण देणाऱ्यांचीही नावे जाहीर करा-भास्करराव अंबेकर

**जालना | प्रतिनिधी**

**शहरातील दत्तनगर येथे हर्शल मोटवानी व सौरभ मोटवानी यांना काही अज्ञात समाजकंटकांनी क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून मारहाण केल्याचीन घटना नुकतीच घडली. या घटनेची माहिती कळताच शिवसेना संपर्कप्रमुख श्री.भास्करराव अंबेकर यांनी पदाधिकाऱ्यांसह मोटवानी त्यांच्या निवास्थानी जाऊन भेट घेतली व अत्यंत भयभीत झालेल्या मोटवानी कुटुंबीयांना धीर दिला. यावेळी यांच्यासोबत माजी शहरप्रमुख बाला परदेशी, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, योगेश भगत, दीपक राठोड, अर्जुन गेही, माजी शहरप्रमुख घनशाम खाकीवाले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.**



यावेळी संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी जालना शहरातील वाढत्या गुंडगिरीचा बिमोड करण्यासाठी त्यांना संरक्षण देणाऱ्यांची नावे जाहीर करण्याची मागणी करतांना म्हणाले की, शहरात गुंडांना कायद्याचा धाक राहिला नाही. पोलीस प्रशासनाचा वचक कमी झाल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. गुन्हेगारांना अटक केल्यानंतर लगेच त्यांना सोडवण्यासाठी त्यांचे रक्षणकर्ते तेथे हजरच असतात. अशा गुंडांना पाठबळ देणाऱ्या रक्षण कर्त्यामुळे शहरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. करिता गुन्हेगारांचे संरक्षण करणारे राजकीय अथवा अराजकीय कोणीही असोत त्या व्यक्तींची नावे जाहीर करावीत जेणेकरून गुन्हेगारांना नेमके कोण पाठबळ देते हे जनतेला कळेल. जालना शहर हे गावठी कट्ट्यांचे केंद्र बनले आहे. अनेकांचे यामुळे निष्पाप बळी गेले आहेत. तरुण पिढी नशेच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होत आहे. नशेच्या गोळ्या खाऊन शहरात दहशत निर्माण केली जात आहे. अशा गुंडांना कायद्याची भीती वाटत नाही. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर करून चौका-चौकात असे गुंड झोडपून काढले पाहिजेत. जेणेकरून सामान्य नागरिकांच्या मनातील भीती त्यामुळे दूर होईल. जालन्यात नूतन पोलीस अधीक्षक आल्यापासून मात्र नागरिकात एक आशावाद निर्माण झाला आहे. तरुण मुली, महिला, व्यापारी व सामान्य नागरिक यांच्या मनातील भीती घालवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे भास्करराव अंबेकर म्हणाले. दरम्यान दत्तनगर येथील जखमींची विचारपूस करतानाच माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांना दूरध्वनीवरून सविस्तर माहिती दिली. ते अधिवेशना निमित्त मुंबईत असल्याने जालन्यात आल्यावर पोलीस अधीक्षकांची शिवसेना पदाधिकाऱ्यांसह भेट घेऊन कठोर कारवाईची मागणी करणार असल्याचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी सांगितले.

# निलंबनानंतरही मुख्याध्यापकाचा मूळ शाळेवरच ठिय्या!

## वडझरी आश्रमशाळेचा कारभार 'रामभरोसे'; वरिष्ठ आदेशांची उघड अवहेलना; तक्रारदार कर्मचाऱ्यांची दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**पाटोदा | प्रतिनिधी**

**तालुक्यातील वडझरी येथील मातोश्री सेवाभावी संस्था संचलित प्राथमिक आश्रमशाळेतील प्रशासकीय कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होऊनही शाळेला नियमित मुख्याध्यापक मिळालेला नसून, निलंबित करण्यात आलेले तत्कालीन मुख्याध्यापक अद्यापही मूळ शाळेचा पदभार सोडण्यास तयार नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.**

गंभीर आर्थिक अनियमितता व प्रशासकीय बेजबाबदारपणाच्या कारणावरून तत्कालीन मुख्याध्यापक प्रविण लिंबाजी वनवे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. मात्र वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या आदेशानंतरही त्यांनी पदभार सोडलेला नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नियोजन, प्रवेश प्रक्रिया आणि कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, वडझरी आश्रमशाळेतील शिक्षिका श्रीमती विनिता भीमराव बांगर यांच्या हजेरीपत्रक, बँक स्टेटमेंट व वेतनाशी संबंधित कागदपत्रांच्या तपासणीसह शालेय पोषण आहार प्रकरणातही चौकशी सुरू होती. या प्रकरणात शिक्षण अधिकारी, बीड यांनी मुख्याध्यापकांकडून १ लाख २२ हजार ९९० रुपयांची वसुली करण्याचे आदेश दिले होते. तसेच संबंधित प्रकरणातील अहवाल सादर करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडून वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र विहित मुदतीत माहिती सादर न केल्याने प्रशासकीय असहकार्याचा ठपका ठेवत प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण, छत्रपती संभाजीनगर यांनी आदेश क्र. ८५४ दिनांक १३ मे २०२६ अन्वये प्रविण वनवे यांच्या निलंबनाचे आदेश जारी केले. निलंबन कालावधीत त्यांना प्राथमिक आश्रमशाळा दारावती (ता. परळी वैजनाथ, जि. बीड) येथे मुख्यालय देण्यात आले होते. सहाय्यक संचालक कार्यालयाने २० मे २०२६ रोजी आदेश देऊन तात्काळ रुजू होण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर २७ मे आणि १६ जून रोजीही सक्त सूचना देण्यात आल्या. मात्र तरीही त्यांनी मूळ शाळेचा पदभार सोडलेला नसल्याचा आरोप आहे. दरम्यान, शाळा सुरू होऊन तीन दिवस उलटले तरी नवीन मुख्याध्यापक किंवा प्रभारी व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासन केवळ पत्रव्यवहार करत असून प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याने पालक व तक्रारदार कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. वरिष्ठ आदेशांची अवहेलना करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करून वडझरी आश्रमशाळेचा कारभार सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी तक्रारदार कर्मचारी व परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# परळीत थार गाडीची धडक की जीवघेणा हल्ला?

## प्रशांत देशमुख गंभीर जखमी; सीसीटीव्हीत थार गाडी कैद, आरोपीला तातडीने अटक करण्याची मागणी

**परळी वै.| प्रतिनिधी**

**परळी वैजनाथ येथे एका धक्कादायक घटनेत प्रशांत प्रल्हाद देशमुख यांना थार गाडीने संत भगवान बाबा चौक ते तहसील कडे जाणाऱ्या रस्त्यावर धडक देऊन चालक घटनास्थळावरून पळून गेल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेत प्रशांत देशमुख गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.**



या प्रकरणामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून देशमुख कुटुंबीयांनी हा केवळ अपघात नसून जाणीवपूर्वक जीवे मारण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये संबंधित थार गाडी स्पष्टपणे दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. देशमुख कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, फुटेजमध्ये चारचाकी वाहन चालकाने संशयास्पद पद्धतीने मागून गाडी आणून धडक दिल्याचे दिसत असून या घटनेची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या घटनेप्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून संबंधित वाहन चालकाचा शोध घेण्यासाठी पोलीस यंत्रणा कामाला लागल्याचे सांगितले जात आहे. ''सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असताना आरोपीला तात्काळ अटक करून त्याच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करावा,'' अशी जोरदार मागणी देशमुख कुटुंबीयांसह नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू असून पुढील कारवाईकडे संपूर्ण परळीकरांचे लक्ष लागले आहे.

## पान १ वरून...

### युरियाची पहिली खेप

होर्मुझ सामुद्रधुनीतून मार्गक्रमण करणे आवश्यक होते. आता त्यापैकी पहिले युरिया वाहून आणणारे जहाज भारताकडे रवाना झाले असून पुढील काही दिवसांत आणखी सात युरिया जहाजेही मार्गस्थ होण्याची शक्यता उद्योग क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे. देशातील खतांची उपलब्धता वाढवण्यासाठी भारतीय कंपन्यांनी १ मार्चपासून आतापर्यंत सुमारे ५० लाख टन खत आयातीचे करार केले आहेत. त्यापैकी २१.९५ लाख टन युरिया आणि ४.१८ लाख टन डीएपी आधीच भारतात दाखल झाले आहे. याशिवाय नॅशनल फर्टिलायझर्स लिमिटेड (एनएफएल) या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीने आणखी १७ लाख टन युरिया आयातीसाठी निविदा काढली असून त्या प्रस्तावाच्या मंजुरीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती खत मंत्रालयाच्या संयुक्त सचिव बंदना प्रयाशी यांनी नुकतीच दिली. दरम्यान, केंद्र सरकारने देशातील खत उपलब्धतेबाबत कोणतीही चिंता नसल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, १ मार्च ते १४ जून या कालावधीत भारताने ३९.३६ लाख टन खतांची आयात केली असून देशांतर्गत उत्पादन १२३.६५ लाख टनांपर्यंत पोहोचले आहे. १४ जूनअखेर देशातील एकूण खतसाठा १९६.६५ लाख टन इतका होता. तर चालू खरीप हंगामात खतांची विक्री आधीच १०२.७८ लाख टनांपर्यंत पोहोचल्याचे नोंदविण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही भारतासाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण होताना दिसत आहे. आशियातील अनेक देशांमध्ये युरियाची मागणी कमी झाल्याने जागतिक बाजारातील दर नरमले आहेत. विशेषतः ऑस्ट्रेलियाने चालू पीक हंगामात युरिया आयात न करण्याचा निर्णय घेतल्याने जागतिक बाजारावर अतिरिक्त दबाव निर्माण झाला आहे. परिणामी भारताला तुलनेने कमी दरात युरिया उपलब्ध होण्याची संधी निर्माण झाली आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेली अनिश्चितता अद्याप पूर्णपणे दूर झालेली नसली, तरी होर्मुझ सामुद्रधुनीतून पुन्हा वाहतूक सुरू झाल्याने भारतासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. खरीप हंगामात युरिया आणि इतर खतांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकार आणि खत कंपन्यांकडून आयात प्रक्रियेला वेग देण्यात येत आहे. पुढील काही आठवड्यांत अडकलेल्या उर्वरित खेपा भारतात पोहोचल्यास देशातील खत उपलब्धतेची स्थिती आणखी मजबूत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

-----------

### पीएम किसानचा २३ वा हप्ता बँकेत

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत, देशातील शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपयांचे अर्थसाह्य दिले जाते. प्रत्येकी २ हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्यात येते. याआधी पीएम किसान योजनेचा २२ वा हप्ता १३ मार्च २०२६ रोजी वितरित करण्यात आला होता. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांसाठी काही अटी लागू आहेत. त्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच बँक खाते आधारशी लिंक असणे गरजेचे आहे. शेतकरी ओळखपत्र म्हणजेच फार्मर आयडी असायला हवे. जर ही प्रक्रिया पूर्ण केली नसेल तर पीएम किसान योजनेचा २३ वा हप्ता थांबू शकतो.

------------

### पवनराजे खटल्यातील सर्व आरोपींची

चुकांवर अत्यंत गंभीर बोट ठेवले. न्यायाधीश म्हणाले, ''२० वर्षांनंतर मी हा निकाल देतोय, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे की एका लोकनेत्याची अशा प्रकारे कळंबोली येथे गोळीबार करून हत्या होते. सुरुवातीला कळंबोली पोलीस, नंतर नवी मुंबई गुन्हे शाखा आणि अखेर सीबीआयकडे हा तपास गेला. या प्रकरणात १२७ साक्षीदार तपासले गेले. न्यायालय केवळ कायद्याच्या चौकटीत राहूनच हा निकाल देत आहे. न्यायालयाने म्हटले की, ''हा खटला पूर्णपणे माफीचा साक्षीदार पारसमल जैन याच्या साक्षीवर उभा आहे. जैनच्या म्हणण्यानुसार गुन्हे शाखेने त्याला ८ सप्टेंबर २००९ रोजी मुंब्रा येथून ताब्यात घेतले, मात्र त्याला अधिकृत अटक २५ सप्टेंबर दाखवली. या दरम्यान त्याला १५ दिवस बेकायदेशीर ताब्यात ठेवून मारहाण करण्यात आली, औषधे बंद केली आणि कबुलीजबाब घेतला. हा पहिला जबाब कायद्याला धरून नव्हता आणि सरकारी पक्षाने ही माहिती न्यायालयाला न सांगून मोठी घोडचूक केली, ज्यामुळे हा पुरावा संशयाच्या खाईत ढकलला गेला. दोन्ही जबाबात मोठी तफावत आहे.'' माफीच्या साक्षीदाराने पैशांमुळे हा गुन्हा केल्याचा दावा केला होता, जो न्यायालयाने फेटाळून लावला. न्यायमूर्ती म्हणाले, ''साक्षीदाराचे मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर येथे अनेक घरे आणि मिठाईची दुकाने आहेत. त्याच्याकडे साडेचार किलो सोन्याचे भांडवल आहे. त्याचा कुठलाही उद्योग डबघाईला आलेला नव्हता. अशा परिस्थितीत त्याला केवळ ५० हजार रुपयांची गरज होती म्हणून त्याने एवढी मोठी हत्या केली, हे अजिबात पटणारे नाही. त्याला सोयीनुसार खोटं बोलण्याची सवय आहे.'' तपासातील सर्वात मोठ्या त्रुटीवर बोट ठेवताना न्यायालय म्हणाले, ''या खटल्याचा तपास करताना कुठल्याही आरोपीचा मोबाईल फोन जप्त केलेला नाही. त्यांचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड काढले गेले नाहीत. जप्ती पंचनाम्यात आरोपींच्या खिशात काय सापडले याची नोंद नाही. जर सीडीआर काढले असते, तर आरोपी एकमेकांच्या संपर्कात होते का, हे स्पष्ट झाले असते. घटनाक्रमात १२ कॉल रेकॉर्डचा उल्लेख आहे, ज्यातील एक फोन पीसीओ वरून झाला होता. पवनराजेंना आरोपींचा थेट फोन आलाच नाही, तर मग पाठलागाची आणि संवादाची ही कथा ग्राह्य कशी धरायची?''न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, माफीच्या साक्षीदाराने हत्येच्या दिवशी तो मुंबईबाहेर कसा गेला, याच्या वेळोवेळी चार वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. न्यायाधीश म्हणाले, ''प्रत्येक वेळी नवीन स्टोरी सांगणाऱ्या या साक्षीदाराची साक्ष अजिबात विश्वासार्ह मानली जाऊ शकत नाही. गुन्ह्यात वापरलेली गाडी जळून खाक झाली होती. तरीही जप्ती पंचनाम्यात तिचा रंग हिरवा कसा लिहिला? कागदपत्रे पाहून रंग लिहिल्याचे अधिकारी सांगतात, मात्र मूळ पुरावा सिद्ध होत नाही. एका साक्षीदाराने गाडी छोट्या घराच्या बाजूला उभी असल्याचे सांगितले, दुसऱ्याने बंगल्याच्या बाजूला, तर पोलीस रेकॉर्डनुसार ती मोकळ्या जागेत सापडली. या सर्व लहान गोष्टींमधील तफावत सरकारी पक्षाचा हेतू संशयास्पद बनवते. न्यायालयाने मान्य केले की, २००२ नंतर पवनराजे निंबाळकर आणि डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यात तेरणा साखर कारखाना आणि निवडणुकीतील पराभवामुळे मोठी राजकीय दरी निर्माण झाली होती. पूर्ववैमनस्यातून हत्येचा कट रचल्याचा सीबीआयचा आरोप होता आणि पवनराजेंनी जीवाला धोका असल्याचे पत्रही जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, केवळ राजकीय वैमनस्य आहे म्हणून कोणाला फासावर लटकवता येत नाही, त्यासाठी कायद्याला ठोस पुराव्यांची गरज असते.

----------------

### अयोध्येतील राम मंदिराच्या देणगीत

व्यवस्थापनाबाबत गैरव्यवहाराच्या चर्चा सुरू झाल्यानंतर अनेक भाविकांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. देणगीची रक्कम कशी हाताळली जाते, तिचा वापर कुठे होतो आणि त्यात पारदर्शकता आहे का, असे प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारले जात आहेत. दरम्यान, स्थानिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या काही अहवालांमुळे या वादाला आणखी हवा मिळाली आहे. चौकशीदरम्यान देणगी मोजणीशी संबंधित काही सीसीटीव्ही फुटेज हटवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे फुटेज तांत्रिक कारणामुळे नष्ट झाले की जाणीवपूर्वक डिलीट करण्यात आले, याचा तपास सुरू असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय देणगी मोजण्याची जागा आणि प्रक्रिया वेळोवेळी बदलण्यात आल्याच्याही चर्चा आहेत. तपास यंत्रणा या बदलांची नोंदी आणि देखरेख व्यवस्थेवर काही परिणाम झाला का, याची माहिती घेत आहे. काही पुजारी आणि मंदिर व्यवस्थापनाशी संबंधित कर्मचाऱ्यांकडूनही चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. हा वाद केवळ देणगीपुरता मर्यादित नसल्याचेही बोलले जात आहे. मंदिर ट्रस्टच्या काही निर्णयांबाबत तसेच जमीन खरेदीशी संबंधित व्यवहारांबाबतही चौकशीचा विस्तार होऊ शकतो, अशी चर्चा सुरू आहे. मात्र यासंदर्भात अद्याप कोणताही अधिकृत निष्कर्ष जाहीर करण्यात आलेला नाही. राम मंदिर आंदोलनाशी संबंधित काही संत आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. जर कोणतीही अनियमितता झाली असेल तर दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी त्यांची भूमिका आहे. त्यांच्या मते, मंदिराची प्रतिष्ठा आणि कोट्यवधी भक्तांचा विश्वास कायम राखणे सर्वात महत्त्वाचे आहे. सध्या भाविकांच्या मनात एकच प्रश्न आहे, प्रभू श्रीरामांच्या नावाने अर्पण करण्यात आलेल्या देणगीची जबाबदारी नेमकी कोणाची? आता या प्रकरणाच्या चौकशी अहवालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. तपासातून नेमके काय समोर येते आणि मंदिर प्रशासन यावर काय भूमिका घेते, यावर पुढील घडामोडी अवलंबून असणार आहेत.

-------------

### हनुमान मंदिराचा सभामंडप कोसळून

दर्शनासाठी आणि महाप्रसादासाठी उपस्थित असताना, नव्याने बांधण्यात येत असलेल्या छताचा आणि पिलरचा मोठा भाग पत्त्यासारखा कोसळला. हा दगडी ढिगारा थेट खाली उभ्या असलेल्या भाविकांवर पडल्याने कोणालाही सावध होण्याची संधी मिळाली नाही. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, छत कोसळताना मोठा आवाज झाला आणि सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले. भाविकांमध्ये एकच पळापळ सुरू झाली. छताखाली आणि दगडी ढिगाऱ्याखाली अनेक लोक गाडले गेल. घटनास्थळावरील दृश्य अत्यंत थरकाप उडवणारे होते. दगडी बांधकामाचा भाग भाविकांवर पडल्याने अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. घटना घडताच परिसरात उपस्थित असलेल्या इतर भाविकांनी आणि स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने ढिगारा उपसण्याचे आणि बचावकार्य सुरू केले. घटनेचे गांभीर्य ओळखून प्रशासकीय यंत्रणा तातडीने कामाला लागली. मानवत, परभणी, सेलू आणि पाथरी येथून तात्काळ रुग्णवाहिका, अग्निशामक दलाच्या गाड्या आणि वैद्यकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. ढिगाऱ्याखालून काढण्यात आलेल्या जखमी भाविकांना तात्काळ उपचारासाठी परभणी येथील शासकीय जिल्हा रुग्णालय तसेच विविध खासगी रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिराच्या विस्तारीकरणाचे काम सुरू असताना सुरक्षेची काळजी घेतली गेली होती का, तसेच वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा कसा होता, असे गंभीर प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. दुर्घटनेचे नेमके तांत्रिक कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, जिल्हा प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास आणि चौकशी सुरू केली आहे. या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण परभणी जिल्ह्यावर आणि यशवाडी परिसरावर मोठी शोककळा पसरली आहे.

-----------

### आषाढी यात्रेसाठी एसटीच्या

वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था केली. सुमारे १३ हजार कर्मचारी या सुविधेचा लाभ घेणार असल्याचे सांगितले. पुढे बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनासोबत कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होऊन भाविकांचा प्रवास सुलभ होणार आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

-------------



## समर्थ दवाखाना'चे भव्य उद्घाटन; महाराज मंडळी व जयदत्त धस यांच्या हस्ते शुभारंभ

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील बस स्टँडसमोरील गाळा क्र. २ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'समर्थ दातांचा दवाखाना' या नूतन व अत्याधुनिक दंतचिकित्सा केंद्राचा भव्य उद्घाटन सोहळा व सत्यनारायण महापूजा शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या दवाखान्याचे उद्घाटन पूजनीय महाराज मंडळी, मा. आमदार सुरेश (आण्णा) धस यांचे सुपुत्र जयदत्त (भैय्या) धस तसेच उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. विजय गर्जे यांच्या या नव्या उपक्रमाचे कौतुक करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास ह.भ.प. राधाताई महाराज (संत मिराबाई संस्थान, महासांगवी), ह.भ.प. सतीश महाराज उरणकर व रामकृष्ण रंधवे महाराज यांची विशेष उपस्थिती लाभली. संतांच्या आशीर्वादाने कार्यक्रमास आध्यात्मिक वातावरण लाभले. उद्घाटन सोहळ्यास नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, नगरसेवक नयूम पठाण, महेंद्र तात्या गर्जे, मधुकर गर्जे, सद्गुरू गर्जे सर, छगन मुळे, आप्पासाहेब राख, विजय जाधव, चांगदेव गीते, नामदेव सानप (सरपंच, महासांगवी), किशोर आडागळे, रोहिदास गीते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. श्री. रवींद्र उत्तम गर्जे यांचे सुपुत्र डॉ. विजय गर्जे यांनी सुरू केलेल्या या दवाखान्यात दातांच्या सर्व प्रकारच्या आधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे पाटोदा व परिसरातील नागरिकांना उपचारासाठी मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नसल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. उद्घाटन सोहळ्यास मोठ्या संख्येने नागरिक, व्यापारी, ग्रामस्थ व गर्जे परिवाराचे स्नेही उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांचे आभार मानण्यात आले.



## वादळी वाऱ्याने अर्धामसला येथील शेतकरी यांचे सौर पंपाचे नुकसान

अर्धामसला । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अर्धामसला येथे वादळी वारामुळे शेतकरी संतोष बाबासाहेब पिंपळे यांच्या शेतातील गटनंबर १७९ सौरऊर्जा पंपाच्या पाट्या उडून गेल्यामुळे पाट्या फुटल्या आहेत यात या शेतकरी यांचे मोठे नुकसान झाले आहे तरी शेतकरी यांनी मदत करावी अशी मागणी शेतकरी यांनी केली आहे.

# कागदावर सिमेंट रस्ते अन् कॉम्प्युटर खरेदी ३६ लाखांचा बोगस खर्च दाखवून अपहार ?

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी तालुक्यातील चिंचाळा ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि अधिकाऱ्यांनी संगनमत करून तब्बल ३६ लाख ३० हजार ३८२ रुपयांचा मोठा अपहार केल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रत्यक्षात बेकायदेशीरपणे हा निधी उचलून शासन आणि कोणतीही विकासकामे न करता, गावकऱ्यांची मोठी फसवणूक करण्यात आल्याची तक्रार चिंचाळा येथील समस्त गावकऱ्यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे गुरुवारी केली आहे.**

डिसेंबर २०२२ पासून चिंचाळा येथे विद्यमान सरपंच आणि सदस्य कारभार पाहत आहेत. गावाच्या विकासासाठी आलेल्या निधीची 'मेरी पंचायत' ॲपवर पडताळणी केली असता, प्रत्यक्षात एकही काम न होता लाखो रुपयांची रक्कम खर्च (डेबिट) झाल्याचे समोर आले. गावात वर्षानुवर्षे भीषण पाणीटंचाई असतानाही, पाणीपुरवठा आणि देखभालीच्या नावाखाली तब्बल १६ लाख २७ हजार ६५० रुपये इदप करण्यात आले याशिवाय नतीन सिमेंट रस्त्यासाठी २ लाख ६





**चिंचाळा येथील सरपंच, ग्रामसेवकाविरुद्ध गावकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार**

हजार रुपये, ड्रेनेज दुरुस्तीसाठी ३ लाख ५८ हजार रुपये, कॉम्प्युटरसाठी १ लाख २८ हजार रुपये, फर्निचरसाठी १ लाख ५९ हजार रुपये, कचरा गोळा करणाऱ्या रिक्षासाठी ४ लाख रुपये आणि २०२५-२६मधील उपकरणांसाठी २ लाख ९९ हजार ७३९ रुपये बेकायदेशीरपणे काढण्यात आले. चिंचाळा गावात आजतागायत तक्रारीतील कोणतेही काम झालेले नाहीत. हा शासकीय निधी परस्पर लाटला असून मोठा आर्थिक गैरव्यवहार केला आहे, असा थेट आरोप गावकऱ्यांनी केला आहे. याची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी आग्रही मागणी चिंचाळा येथील जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी ॲड. चंद्रकांत पवार, विष्णुपंत नेमाटे, राजेश चाळक, दीपक सवासे, ज्ञानेश्वर आजबे, मुकुंद चाळक आदींची उपस्थिती होती

जिल्हाधिकाऱ्यांकडून थेट कारवाईचे निर्देश

निवेदन देताच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही या प्रकरणाची तातडीने दखल घेतली. त्यांनी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांना तातडीने हे पत्र पाठवून चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.


## यशाचे गुरुकृपा छत्र! औषधनिर्माणशास्त्र पदविका परीक्षेत विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एम.एस.बी.टी.ई.) द्वारे घेण्यात आलेल्या उन्हाळी डिप्लोमा परीक्षेत माजलगाव येथील नामांकित गुरुकृपा इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत चमकदार कामगिरी करत महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या औषधनिर्माणशास्त्र पदविका परीक्षेच्या निकालात महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षाचा निकाल ९२% आणि प्रथम वर्षाचा ८६% लागला असून अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश संपादन केले आहे.







यंदाच्या परीक्षेत संस्थेतील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणि सातत्याच्या जोरावर घवघवीत यश मिळवले. परीक्षेमध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्तम गुणांकन मिळवून अव्वल स्थान पटकावले आहे.

डी. फार्मसी द्वितीय वर्षाचा निकाल अनुक्रमे प्रथम क्रमांक साक्षी कदम ( ७४.६४%) द्वितीय क्रमांक तनुजा डुकरे ( ७४.५५%) तृतीय क्रमांक हर्षदा धनवडे ( ७३.६४%) डी. फार्मसी प्रथम वर्ष निकाल अनुक्रमे प्रथम क्रमांक स्वाती वांडरे (७५.५०%) द्वितीय क्रमांक साक्षी मोरे (७३.३०) तृतीय क्रमांक मयुरी तौर (७२.२०%)

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक

या यशाबद्दल बोलताना संस्थेच्या प्रशासनाने आणि प्राचार्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि त्यांना अहोरात्र मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक वृंदांचे मनापासून अभिनंदन केले. ''विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या चिकाटीचे आणि महाविद्यालयातील दर्जेदार शिक्षण पद्धतीचे प्रतीक आहे,'' अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य तसेच माजलगाव परिसरातील नागरिकांकडून आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. आगामी काळातही ही यशाची घोडदौड अशीच सुरू राहील, असा विश्वास महाविद्यालयाने व्यक्त केला आहे.

## पान ६ वरुन...

### आदित्य कृषी महाविद्यालयात

याप्रसंगी बोलताना प्राचार्य प्रा. शाम भूतडा यांनी वाढते प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढीवर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यांचे नियमित संगोपन, पाणी व्यवस्थापन आणि संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. हवामान बदलाच्या संकटावर मात करायची असेल, तर प्रत्येकाने वृक्ष संवर्धनात सक्रिय वाटा उचलला पाहिजे. या मोहिमेत महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभाग घेतला. महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या पर्यावरणपूरक व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना जैवविविधता, जलसंधारण आणि हरित परिसर निर्मितीचे महत्त्व पटवून देण्यात आले. प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगवायचेच',अशी सामूहिक शपथ विद्यार्थ्यांनी घेतली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे बीड परिसरातील पर्यावरणप्रेमींकडून कौतुक होत आहे.

**वृक्षारोपण ही केवळ औपचारिकता नव्हे, तर कर्तव्य : डॉ. आदिती सारडा**

आज आपण निसर्गाच्या असमतोलाचा आणि वाढत्या तापमानाचा सामना करत आहोत. यावर एकमेव प्रभावी उपाय म्हणजे वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन हाच आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केवळ झाडे लावून चालणार नाही, तर लावलेले प्रत्येक झाड जगवणे, त्याला पाणी देणे आणि त्याचे संरक्षण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. आदित्य शिक्षण संस्थेचा नेहमीच असा प्रयत्न असतो की, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच सामाजिक आणि पर्यावरणीय भानही निर्माण व्हावे.आजच्या तरुण पिढीने पर्यावरणाचे रक्षक बनून हरित वसुंधरा निर्माण करण्यासाठी पुढे आले पाहिजे.

### नगर नाका चौक ते संत सेवालाल

पावसाळ्याआधी हे खड्डे बुजवणे आणि रस्त्याच्या मधोमध असलेले विद्युत खांब काढणे महत्त्वाचे आहे. या मागणीकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष केल्यास नागरिकांसाठी असलेल्या या महत्त्वाच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर समर्थक संजय धुरंधरे यांनी दिला आहे.

### रोटरीचा चंपावती भूषण पुरस्कार

यांनी हा सन्मान वैयक्तिक नसून संत परंपरा आणि समाजसेवेचा गौरव असल्याची भावना व्यक्त केली. तर ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू यांनी हा पुरस्कार विठ्ठल भक्ती, समाजसेवा आणि वारकरी परंपरेच्या कार्याला मिळालेला सन्मान असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटेगाव यांना डिजिटल शिक्षणासाठी स्मार्ट टीव्ही प्रदान करण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. अनुराग जैन यांनी केले, तर रो. प्रो. डॉ. प्रकाश कोंका यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रो. मनोज थीगळे, सर्व संचालक मंडळ, रोटेरियन सदस्य व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी अरुण नाना डाके, डॉ. मनोजकुमार नवसे, विश्वास आखाडे, नामदेव भाऊ दुधाळ, मोहनराव गोरे, लक्ष्मण गुंजाळ, अर्जुन राऊत, बब्रुवान खेत्रे, महादेव दुधाळ, पी आर दुधाळ साहेब, गोवर्धन आखाडे वारकरी संप्रदायातील भाविक, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माळी समाज विद्यार्थी

मिळवावे, असे आवाहन करण्यात आले. यशासाठी जिद्द, सातत्य, प्रामाणिकपणा आणि ध्येयवेड आवश्यक असल्याचे सांगत पालकांनीही आपल्या अपेक्षांचे ओझे मुलांवर लादू नये, असा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजीव काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रणजीत आखाडे व प्रकाश गोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शामसुंदर साळुंके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माळी समाज कर्मचारी सेवा संघांचे सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

या गुणगौरव व करिअर मार्गदर्शन सोहळ्यास विद्यार्थी, पालक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑपरेशन टायगर ऐवजी ऑपरेशन सरसकट कर्जमाफी राबवावे-आमटे

बीड । प्रतिनिधी

कर्जाच्या डोंगरपाई शेतकरी देशोधडीला लागला आहे. सरकारने कर्जमाफीची घोषणा फसवी केली आहे या फसव्या कर्जमाफी मध्ये शेतकऱ्याच्या पदरात पडणार नाही सरकारने ऑपरेशन टायगर राबवले, ऑपरेशन टी एम सी राबवले, ऑपरेशन आप राबवले, ऑपरेशन एन सी पी राबवले पण सरकारने ऑपरेशन कर्जमाफी राबवावे सरकारला खासदार फोडायला पैसे आहेत पण शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यासाठी पैसेच नाही का? सरकारने सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केली

शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड जिल्ह्यातील बऱ्हाणपूर येथे सरकारच्या फसव्या कर्जमाफी



जीआरची होळी करण्यात आली या वेळी शेतकऱ्यांमध्ये फसव्या कर्जमाफी संदर्भात शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जागृती करण्यात आली. शेतकरी हक्क मोर्चा गावो गावी जाऊन सरकारच्या विरोधात फसव्या कर्जमाफी विषयी जागृती अभियान राबवत आहे. बीड जिल्ह्यात मागील वर्षी अतिवृष्टी ने धुमाकूळ घातला गावची गाव अतिवृष्टी नुकसान झाले तर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा का मिळत नाही? सरकारने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पीक विमा तत्काळ देण्यात यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे,काशिनाथ लांडे, अतुल लांडे, मोहन लांडे, बन्सी कानडे, राम चिरके मच्छिंद्र लांडे, नारायण लांडे, नीलेश माने, चंद्रसेन क्षीरसागर, सुरेश लांडे, दादासाहेब लांडे, गोरख शिंदे यांनी केली.

## मराठी 'बालभारती' इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकात रोहन बहिर व प्राचार्य केशव भांगे यांचा समावेश

/बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे.यांनी चालू शैक्षणिक वर्ष २९२६-२७ पासून शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे,नव्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार मराठी'बालभारती'इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकात, लेखक दिलीप फलटणकर यांच्या''धाडसी रोहन''या पाठाचा समावेश केला आहे.बीड जिल्ह्यातील राजुरी (नवगण) येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या चिं. रोहन रामचंद्र बहिर या विद्यार्थ्यांने गावातील दुथडी वाहणाऱ्या नदीच्या मोठा पुरात,धुणे धुतांना



वाहून जाणाऱ्या'छायाबाई गायकवाड'या महिलेचे प्राण वाचविले. त्याने दाखविलेल्या धाडसाचे, शौर्याचे,साहस आणि प्रसंगावधान या शाश्वत गुणाचे कौतुक म्हणून,रोहन शिकत असलेल्या 'गजानन महाविद्यालयाचे' तत्कालीन'प्राचार्य केशव भांगे साहेब'यांनी विद्यालयात,रोहनचा भव्य सत्कार करून त्याच्या शौर्याचे व धाडसाचे कौतुक केले.तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,माजी कॅबिनेट मंत्री जयदत्त(अण्णा)क्षीरसागर साहेबांनी चिं.रोहन बहिर आपल्या जन्मभूमीतील व शिक्षण संस्थेतील विद्यार्थी असल्याने,त्याचा हृदय सत्कार व कौतुक करून त्याच्याबद्दल अभिमान व्यक्त केला.

# वडवणीचा ऐतिहासिक एल्गार: शेतकऱ्यांनीच ठरवला दुधाचा भाव, १९ जूनपासून ८० रुपये लिटर

**तुकाराम मुंडेंनी भेसळ उघडी पाडल्यानंतर दूध उत्पादक एकवटले, सरकारला भाव मागणार नाही, आपणच ठरवणार असा निर्धार महाराष्ट्रात पहिल्यांदाच शेतकऱ्यांनी स्वतःच्या दुधाला दिला योग्य भाव, ८० रु.ने विक्री सुरू; ग्राहकांचाही सकारात्मक प्रतिसाद**

वडवणी प्रतिनिधी

आतापर्यंत दुधाचा भाव ठरवण्याचा अधिकार सरकारकडे, डेअरीचालकांकडे होता. शेतकरी फक्त किंमत ऐकायचा. पण वडवणी तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी हा पायंडा मोडून काढला. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्वतःच्या दुधाचा भाव स्वतः ठरवला आणि त्याची अंमलबजावणीही सुरू केली.

काल, गुरुवार दि. १८ जून २०२६ रोजी रेणुका माता मंगल कार्यालय, वडवणी येथे झालेल्या ऐतिहासिक बैठकीत २० हून अधिक गावांतील ३०० पेक्षा जास्त दूध उत्पादक शेतकरी एकवटले. तुकाराम मुंडे साहेबांच्या प्रेरणेतून आणि दुधातील भेसळीविरोधात त्यांनी उघडलेल्या लढ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला. या बैठकीत एकमुखाने ठराव मंजूर करण्यात आला की, दि. १९ जून २०२६ पासून वडवणी तालुक्यात दुधाला किमान ८०₹ प्रति लिटर भाव बंधनकारक राहील.

**भेसळीचे कंबरडे मोडले, खऱ्या दुधाला मिळणार न्याय**

आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभरातील दूध भेसळीचे रॅकेट उघडे पाडले. बनावट दूध, भेसळयुक्त खवा, पनीर बनवणाऱ्या माफियांना त्यांनी सोडून सोडले. त्यामुळे बाजारात खोट्या दूधजन्य पदार्थांचे पीक बेपत्ता झाले. दूध बाजार आता स्वच्छ झाला आहे.

''आतापर्यंत भेसळयुक्त दुधामुळे खऱ्या शेतकऱ्यांच्या दुधाला भाव मिळत नव्हता. डेअरीवाले भेसळीचे दूध स्वस्तात घेऊन आमच्या घामाच्या दुधाला कवडीमोल भाव देत होते. आता ते दिवस संपले,'' अशी भावना बैठकीत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

महागाईत तग धरणे कठीण, म्हणून स्वतःच उचलले पाऊल

सध्या पशुखाद्य, वैरण, मजुरी, औषधांचे दर गगनाला भिडले आहेत. ३०-३५ रुपयांत दूध विकून शेतकरी कर्जबाजारी होत होता. अनेकांनी जनावरे विकायला काढली होती. ''या महागाईत दूध उत्पादक शेतकरी टिकणार नाही, अशी भीषण परिस्थिती आहे. सरकार दरवाढ करत नाही, मग आम्हीच आमचा भाव ठरवायचा निर्णय घेतला,'' असे एका शेतकऱ्याने सांगितले.

**ठरावाची काटेकोर अंमलबजावणी सुरू**

बैठकीतील निर्णयानुसार, १९ जूनपासून वडवणी तालुक्यातील कोणत्याही दूध डेअरीला, संकलन केंद्राला शेतकऱ्यांकडून ८०₹ पेक्षा कमी भावाने दूध खरेदी करता येणार नाही. प्रत्येक दूध संकलन केंद्रावर १९ जूनपासून दुधाला ८०₹ भाव असा ठळक फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. जो डेअरीचालक या निर्णयाचे उल्लंघन करेल, त्याच्यावर गावकऱ्यांकडून सामाजिक बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला आहे. शहर व तालुक्यात घरगुती दूध विक्रीही ८०₹ प्रतिलिटर दरानेच होणार आहे. विशेष म्हणजे, या निर्णयाचे ग्राहकांनीही स्वागत केले आहे. ''शेतकऱ्याला जगवायचं असेल तर योग्य भाव द्यायलाच हवा. फक्त दूध शुद्ध आणि भेसळमुक्त असावे,'' अशी मागणी ग्राहकांनी केली. शेतकऱ्यांनीही ग्राहकांना १०० टक्के शुद्ध दूध पुरवण्याची हमी दिली आहे.

**१०० रु.साठी पुढचा लढा सुरूच राहणार**

''आमचा मूळ लढा दुधाला १००₹ भाव मिळवण्यासाठीच आहे. पण ग्राहकांचाही विचार करून सध्या ८०₹ चा भाव निश्चित केला. ग्राहकांना शुद्ध दूध देऊन त्यांचा विश्वास संपादन करू. जोपर्यंत शेतकऱ्याच्या दुधाला १००₹ भाव मिळत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील,'' असा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

**महाराष्ट्राला नवा मार्ग दाखवणारी वडवणी**

वडवणी हे महाराष्ट्रातील पहिले ठिकाण ठरले आहे जिथे शेतकऱ्यांनी स्वतःच्या दुधाचा भाव स्वतः ठरवून तो यशस्वीपणे लागूही केला. ''यापुढे सरकारकडे भाव मागायचा नाही, तर आपणच आपला भाव वाढवायचा,'' हा संदेश वडवणीतून संपूर्ण राज्यात गेला आहे.

आज, १९ जूनपासून वडवणीत ८०₹ लिटरने दूध विक्री सुरू झाली असून शेतकऱ्यांना त्याचा थेट फायदा होत आहे. ग्राहकांनीही ८०₹ मोजून दूध घेण्याची तयारी दाखवली आहे. वडवणीतून सुरू झालेले दूध भाववाढीचे हे बीज संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचेल आणि बळीराजाला पुन्हा चांगले दिवस येतील, अशी नवी आशा या निर्णयाने निर्माण झाली आहे.

# आरबीआयकडून किसान क्रेडिट कार्ड नियमांत बदल

## नवे नियम जानेवारी २०२७ पासून लागू, शेतकऱ्यांना होणार फायदा

मुंबई : भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) च्या नियमांत बदल केला आहे. शेतकऱ्यांसाठी कर्ज मंजुरी आणि परतफेडीच्या वेळापत्रकात एकसमानता आणण्याचा यामागील उद्देश आहे. यात पीक हंगामांच्या व्याख्येचे मानकीकरण करण्यात आले असून, ती बँकिंग क्षेत्रातील मालमत्ता-वर्गीकरण निकषांशी सुसंगत अशी केली आहे. हे नवे नियम जानेवारी २०२७ पासून लागू होतील.

या माध्यमातून, शेती आणि त्याच्याशी संलग्न क्षेत्राशी जोडलेले शेतकरी आणि कर्जदारांसाठी कर्जवाटप प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न आहे. या नवीन नियमांचा उद्देश हा किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत बँकांकडून पुरेसा आणि वेळेत कर्जपुरवठा सुनिश्चित करणे आहे. ज्यामुळे शेती आणि त्याच्याशी संलग्न क्षेत्रांतील लोकांना खेळते भांडवल आणि गुंतवणूक कर्जाच्या गरजा पूर्ण करता येतील. यासाठी सोपी आणि मानक कार्यपद्धतीवर आधारित एकत्रित सुविधा उपलब्ध दिली जात असल्याचे आरबीआयने म्हटले आहे. यातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे पीक




हंगामांच्या व्याख्येशी संबंधित आहे. ज्यात उत्पन्नाची नोंद आणि मालमत्ता वर्गीकरण नियमांशी सुसंगत राहतील, अशा पद्धतीने बदल केला आहे. किसान क्रेडिट कार्ड योजनेसाठी कमी कालावधीच्या पिकांसाठी पीक हंगाम १२ महिने आणि जास्त कालावधीच्या पिकांसाठी १८ महिने इतका मानक कालावधी निश्चित केला असल्याचे आरबीआयने म्हटले आहे. पीक हंगाम म्हणजे पीक पेरणीपासून ते त्यांची कापणी आणि बाजारातील विक्रीपर्यंतचा कालावधी होय. या वर्षी फेब्रुवारीमध्ये आरबीआयने याबाबत मसुदा जारी केला होता. त्यावरील सल्लामसलतीनंतर हे सुधारित नियम तयार केले आहेत. दरम्यान, तारणाविना कर्जाची कमाल मर्यादा वाढवण्याची मागणी मध्यवर्ती बँकेने फेटाळून लावली आहे. ही मर्यादा नुकतीच डिसेंबर २०२४ मध्ये सुधारित करण्यात आल्याचे आरबीआयने नमूद केले आहे. नवीन निर्देशानुसार, बँका प्रति कर्जदार २ लाख रुपयांपर्यंतच्या शेती आणि शेतीशी संलग्न व्यवसायांसाठीच्या कर्जांच्या तारण आणि मार्जिनची अटींमधील सवलत कायम ठेवतील. तर २ लाख रुपयांहून अधिकच्या कर्जांसाठी, बँका त्यांच्या धोरणांनुसार आणि आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तारण आणि मार्जिन आवश्यकता निश्चित करतील.

**केसीसी योजना :** केसीसी योजना शेतकऱ्यांसाठी १९९८ मध्ये सुरू केली होती. या योजनेअंतर्गत २ ते ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळण्याची सुविधा आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना ७ टक्के व्याजदराने कर्ज दिले दिले जाते. जे शेतकरी वेळेत कर्ज परतफेड करतात; त्यांना सरकारकडून ३ टक्के व्याज अनुदानाचा लाभ दिला जातो. यामुळे प्रभावी व्याजदर केवळ ४ टक्के इतका राहतो. केसीसी योजनेअंतर्गत बियाणे खरेदी ते पीक काढणी कालावधीत कोणत्याही शेतीकामासाठी कर्ज घेता येते.

## लाख रूपयांची 'ड्रॅगन कोंबडी



भारतात कोंबडीच्या अनेक जाती आहेत. वेगवेगळ्या प्रदेशानुसार या कोंबडीच्या जातींना नावे देण्यात आले आहे. आणि प्रत्येक जातीची वैशिष्ट्ये सुद्धा वेगवेगळी आहेत. व्हिएतनाम देशात सापडलेल्या एका ड्रॅगन कोंबडीची किंमत लाखोंमध्ये आहे. या कोंबडीच्या जातीचं नाव 'डोंग ताओ' असं आहे. ज्याला ड्रॅगन चिकनही म्हटले जाते. या कोंबडीला विकत घ्यायचे असेल तर त्या किमतीत आपल्याकडच्या सगळ्यात महाग कडकनाथ चिकनच्या २०० कोंबड्या खरेदी करता येईल एवढी या ड्रॅगन कोंबडीची किंमत आहे. जगातल्या सर्वात महागड्या कोंबड्यांमध्ये ही कोंबडी आता गणली जाऊ लागली आहे.

ही कोंबडी व्हिएतनाममध्ये (जरी सापडली असली तरी याच्या वाढत्या मागणीमुळे जगभरातल्या पोल्ट्री व्यवसायिकांनी या कोंबडीचे पालन करण्यास सुरुवात केली आहे. डॉन्ग टाओ या ड्रॅगन कोंबडीचं पालन व्हिएतनाम देशात आधी सुरू झालं. शेताच्या एका भागात या जातीच्या काही कोंबड्या पाळल्या. या कोंबड्यांचे पाय ही सामान्य कोंबड्यांपेक्षा वेगळे आहेत काहीसा मोठा आकार आणि दिसायला तपकिरी विटेसारखे. याच खास गुणधर्मामुळे जगभरात या ड्रॅगन कोंबडीला प्रचंड मागणी असते. परदेशात नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनमध्ये या कोंबडीच्या चिकनला सर्वाधिक मागणी असते आणि ते खूप महाग विकल्या जाते.

चरबीची मात्रा कमी :या कोंबडीत चरबीची मात्रा कमी असल्याने ड्रॅगन कोंबडीला खाणं लोक पसंत करत आहेत. यासोबतच या कोंबडीचं वजन इतर कोंबड्याच्या तुलनेत अधिक आहे. साधारण १० किलोच्या चिकनमध्ये फॅटही कमी असल्याने याला मागणी वाढती आहे.

स्वादिष्ट चव : ड्रॅगन कोंबडीची चवीला स्वादिष्ट असल्याने या कोंबडीला असणारी मागणी अधिक आहे. या कोंबडीमध्ये प्रोटीनचे प्रमाण भरपूर असल्याने याचे चिकन तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय होत आहे.

## लिली फुलांच्या लागवडीची पद्धत

बाजारपेठेतील मागणी चा विचार करून काळाच्या ओघात पीक पद्धतीत बदल करणे फार गरजेचे आहे. उत्पादनवाढीसाठी देखील ते अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे पारंपारिक पिकांवर भर न देता त्यामध्ये बदल करून विविध नवीन प्रकारच्या पिकांची लागवड करून उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करीत राहणे फार गरजेचे आहे. जर आपण फुलशेतीचा विचार केला तर फुल शेतीमध्ये लिली फुलांची लागवड ही अतिशय आणि सर्वोत्तम पर्याय आहे. फुलांची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे. निव्वळ भारतातच नाही तर जगभरातून फुलांना सतत वाढती मागणी आहे. लिलीच्या फुलांचा उपयोग विशेषतः सजावटीसाठी जास्त प्रमाणात केला जातो. यामध्ये वेगळ्या रंगाचे फुलांचे प्रकार असून शेतकरी लिली फुलांची लागवड करून उत्पन्नाची नवीन दारे उघडी करू शकतात.लीली ही जात विदेशी फुलांची असली तरी भारतामध्ये ती दिवसागणिक प्रसिद्ध होत आहे. जर लिलीची लागवड पॉलिहाऊसमध्ये केली तर वर्षभर उत्पादन घेणे शक्य आहे. पण अजूनही आपल्याकडे लिलीच्या फुलांचा लागवडीला व्यावसायिक स्वरूप आलेले नाही. सध्या भारताचा विचार केला तर हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश तसेच आंध्र प्रदेश मध्ये लिलीची लागवड शेतकरी करतात. सध्या काही प्रमाणात महाराष्ट्रात देखील लिली लागवड केली जात आहे.

लिली फुलांची लागवड पद्धत :लिली ची लागवड तीन टप्प्यांमध्ये केले जाते. यात पहिल्या टप्प्यात टिशू प्रक्रियेतून नर्सरी तयार करतात. हे काम मोठ्या प्रयोग शाळा किंवा कंपन्यांमध्ये केले जाते. दुसऱ्या टप्प्यात नर्सरीत लागवड केली जाते. या वनस्पतीला फुले मिळत नाहीत तर कंद मिळतात. तिसऱ्या टप्प्यात एकंदर भांड्यांमध्ये लावले जातात व यातूनच फुले मिळतात. डोंगराळ राज्यांमधील वातावरण लिली फुलासाठी अनुकूल आहे. अशा भागातील शेतकरी पॉलिहाऊस शिवाय उघड्यावर ही लिलीची लागवड करू शकतात. तर मैदानी भागात लिली लागवडीसाठी पॉली हाऊसची आवश्यकता असते.

पॉलिहाऊसमधील लिली लागवड :पॉलिहाऊसमध्ये



लागवडीसाठी अडीच किलो कोकोपीट,अडीच किलो गांडूळ खत, अडीच किलो स्ट्रा आणि पाच किलो कोळशाची राख आवश्यक आहे. या सर्वांचे एकंदरीत मिश्रण लागवड करणार असलेल्या क्षेत्रावर टाकणे आवश्यक आहे. त्यानंतर कंदाची लागवड करावी लागते. कंद वाढायला तीन महिने लागतात पण याच काळात चांगली काळजी घेणे आवश्यक आहे. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाण्याचे नियोजन केले तर नुकसान टळणार आहे. लागवडीनंतर तीन महिन्यानंतर कंद तयार होते आणि त्यानंतर त्याची मुळासकट काढणी केली जाते.उपलब्ध बाजारपेठ :लीली फुला च्या माध्यमातून भरघोस उत्पादन शेतकऱ्यांच्या पदरी पडते. मात्र ज्याप्रमाणे कांद्याच्या रोपाला मागणी आहे त्याचप्रमाणे या लीली फुलांचे कंद विकून मोठे पैसे कमवता येतात.जर तुम्हाला कंद विकायचे नसतील तर ते भांड्यात ठेवा आणि फुले वाढवून थेट विका. आधीच तयार केलेले मिश्रण प्रत्येकी तीन कदानी भरलेले आहे.त्यानंतर कंद मिश्रणाने झाकला जातो.

पाणी व्यवस्थापन : लागवड केल्यानंतर लगेच पाणी फवारणे महत्त्वाचे आहे.सात दिवसानंतर पॉलिहाऊस चे तापमान २० ते २५ अंश यावर निश्चित करणे योग्य आहे. लागवड केल्यानंतर ३० दिवसांनी हिरवी कमी दिसते आणि त्यानंतर लगेचच फुले फुलतात. लिली ची लागवड सध्या भारतात फारच कमी प्रमाणात होत आहे त्यामुळे कंपन्या शेतकऱ्यांशीआधीच व्यवहार करतात व त्याचा फायदा असा होतो की शेतकऱ्यांना बाजारात जाण्याची गरज पडत नाही.

## नवीन फळबाग लागवडीची पुर्व तयारी

राज्यामध्ये सन १९९०-९१ पासून रोजगार हमी अंतर्गत १०० टक्के अनुदानित फळझाड लागवड ही महत्त्वाकांक्षी योजना सुरु झाली. तेंव्हा पासून फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील शेतकऱ्यांच्या मनावर रुजली. फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरले, असे म्हटले तर वावगे ठरू नये. फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी ''फळबाग लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन'' या महत्वाच्या बाबी आहेत.

फळबागेच्या यशस्वी लागवडीकरिता महत्वाच्या बाबी : आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे? आपल्या जमिनीत फळझाडे येतील का? बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का? आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय? बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील? जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय? प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

फळबागेसाठी जमिनीची निवड : आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम की भारी हे सर्वांना परिचित असतेच. जर माहिती नसेल तर माहिती करून घ्यावी. जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,



मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे, त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे. फार खोल असणाऱ्या जमिनी, क्षारयुक्त जमिनी, चोपण जमिनी यातून पाण्याचा निचरा योग्य होत नाही अशा जमिनीत प्रारंभी झाडे वाढल्यासारखी दिसली तरी पुढे वाढीचा वेग मंदावतो व उत्पादन मिळत नाही. काही वेळा झाडे मरण्याची संभावना असते. तसेच ज्या जमिनीत मुक्त चुनखडीचे प्रमाण १० % पेक्षा जास्त आहे अशा जमिनीत फळबागेची वाढ होत नाही.

माती परिक्षण करण्यासाठी फळबाग क्षेत्रातील मातीचा नमुना : फळबागे करिता मातीचा नमुना घेताना जमिनीच्या प्रकारानुसार प्रातिनिधिक नमुना घ्यावा. सर्वप्रथम ३ बाय ३ बाय ३ फुट खोलीचा (१०० से.मी) किंवा मुरूम लागेपर्यंत खड्डा करून पृष्ठभागापासून प्रत्येक फुटातील प्रतिनिधिक नमुना काढावा व तो वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये भरून तपासणी साठी पाठवावा.माती परीक्षणाप्रमाणेच पाण्याची तपासणी करणे आवश्यक आहे.आपले विहिरीचे/ बोअर चे पाणी क्षारयुक्त वा मचूळ असू नये ते गोड असावे. तेव्हा माती बरोबरच,पाण्याचेही रासायनिक परिक्षण करून घ्यावे आणि त्या अनुषंगानेच फळझाडांची निवड करावी.

फळबागेसाठी पाण्याची उपलब्धता : बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते, अशा बागायती फळझाडांची लागवड करताना कितपत पाणीपुरवठा पुरेल किंवा पाण्याची उपलब्धता किती आहे, याचा विचार करूनच नियोजन करावे. कोरडवाहू फळपिकांना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्ष पाण्याची, चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळझाडांची निवड करावी.

हवामानानुसार फळपिकांची लागवड : महाराष्ट्रातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपच अनुकूल आहे. यामुळे हवामांनाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही. आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत.पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू,पेरू,द्राक्षे,डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत. कोकणसारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा काजू यासारखी फळझाडे घ्यावीत. अति कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घ्यावीत.

फळबाग लागवडीचे अंतर

विविध फळझाडांसाठी खड्डा खोदणे आणि भरणे महत्वाचे, त्याकरिता खड्ड्याचा आकार किती असावा ? हे खड्डे केंव्हा घ्यावेत? आणि केंव्हा भरावेत आणि कसे? जेथे फळझाडांची लागवड करावयाची आहे, तेथे योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत. जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा.फळबाग लागवडीची योग्य वेळ : खात्रीशीर पाऊस झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस जून महिना अगर जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. अतिपावसात अगर पावसाच्या शेवटी सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये फळझाड लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेली झाडे चांगली समाधानकारक वाढतात. काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात.जून-जुलै पर्यंत वेळेवर झाडांची लागवड झाल्यास वाढ जोमाने होते.




### जागतिक दिवस
### आंतरराष्ट्रीय योग दिन
### जागतिक संगीत दिन

### महत्वाच्या घटना

१६७४ : कवीभूषण यांनी '' शिवराय भूषण '' हे काव्य पूर्ण केले.
१७८८ : न्यू हॅम्पशायर अमेरिकेचे ९ वे राज्य बनले.
१८९८ : अमेरिकेने स्पेनकडून 'ग्वाम' हा प्रांत ताब्यात घेतला.
१९४८ : पहिले भारतीय गव्हर्नर जनरल म्हणून चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्याकडे सूत्रे
१९४९ : राजस्थान उच्च न्यायालयाची स्थापना
१९५७ : एलेन फेअरक्लो यांनी कॅनडाच्या पहिल्या महिला कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली.
१९६१ : अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी समुद्राच्या खार्या पाण्याचे गोड्या पाण्यात रुपांतर करणारे यंत्र विकसित केले.
१९७५ : वेस्ट इंडीजने पहिला क्रिकेट विश्वचषक जिंकला.
१९८९ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने देशाचा ध्वज जाळण्याची कृती आणि वाचा स्वातंत्र्याची अभिव्यक्ती असल्यामुळे वैध ठरवली.
१९९१ : भारताचे ९ वे पंतप्रधान म्हणून पी. व्ही. नरसिंह राव यांनी सूत्रे हाती घेतली.
१९९२ : विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाजविज्ञानाच्या क्षेत्रात विशेष कार्य करणार्या डॉ. रघुनाथ माशेलकर यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पारितोषिक जाहीर
१९९५ : पर्यावरणक्षेत्रात विशेष कार्य केल्याबद्दल पर्यावरणतज्ञ रश्मी मयूर यांना अमेरिकेतील 'द युनिटी इन योग इंटरनॅशनल' या संस्थेने विशेष सन्मान जाहीर केला.
१९९८ : फ्रँकफर्ट बुद्धीबळ महोत्सवात विश्वनाथन आनंदने 'फ्रिट्झ-५' या संगणकाचा सहज पराभव केला.
१९९९ : विश्वकरंडक स्पर्धेत १००० धावा पूर्ण करणारा मार्क वॉ (ऑस्ट्रेलिया) हा चौथा खेळाडू ठरला.
२००९ : भारताची बॅडमिंटन स्टार सायना नेहवाल सुपर सिरीज बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली.
२००४ : स्पेसशिपवन या पहिल्या खाजगी अंतराळयानाचे पहिले उड्डाण.
२००६ : नवीनच शोध लागलेल्या प्लूटोच्या उपग्रहांचे 'निक्स' व 'हायड्रा' असे नामकरण करण्यात आले.
२०१५ : जागतिक योग दिनाची पराक्रमी सुरवात.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८१ : फ्रेंच गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ सिमिओन-डेनिसपॉइसॉन यांचा जन्म.
१९०५ : जेआँ-पॉल सार्त्र फ्रेन्च लेखक, कवी, तत्त्वज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: १५ एप्रिल १९८०)
१९१२ : भारतीय लेखक व नाटककार विष्णू प्रभाकर यांचा जन्म.(मृत्यू: ११ एप्रिल २००९)
१९१६ : सुरेन्द्रनाथ कोहली भारताचे ९ वे नौदल प्रमुख (मृत्यू: २१ जानेवारी १९९८)
१९२३ : सदानंद रेगे, मराठी कवी, कथाकार आणि अनुवादक.
१९४१ : भारतीय बिशप अलॉयसियस पॉल डिसोझा यांचा जन्म.
१९५२ : जेरमी कोनी न्यूझीलंडचा क्रिकेटपटू
१९५३ : बेनझीर भूट्टो पाकिस्तानच्या पंतप्रधान (मृत्यू: २७ डिसेंबर २००७)
१९५८ : भारतीय अभिनेत्री रीमा लागू यांचा जन्म. (मृत्यू: १८ मे २०१७)
१९६७ : ईबे चे स्थापक पियरे ओमिदार यांचा जन्म.
१९६७ : थायलंड देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान यिंगलक शिनावात्रा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७४ : स्वीडीश भौतिकशास्त्रज्ञ अँडर्सयोनास अँग्स्ट्रॉम यांचे निधन.
१८९३ : अमेरिकन उद्योगपती तसेच स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीचे संस्थापक लिलँड स्टॅनफोर्ड यांचे निधन.
१९२८ : द्वारकानाथ माधव पितळे तथा नाथमाधव, मराठी कादंबरीकार. (जन्म: ३ एप्रिल १८८२)
१९३२ : आधुनिक काळातील सर्वश्रेष्ठ ब्रजभाषा कवि जगन्नाथदास रत्नाकर यांचे निधन.
१९४० : डॉ. केशव बळीराम हेडगेवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक व पहिले अध्यक्ष (जन्म: १ एप्रिल १८८९)
१९५७ : नोबल पारितोषिक विजेता जर्मन भौतिकशास्त्रज्ञ जोहन्नेस स्टार्क यांचे निधन.
१९७० : सुकार्नो इंडोनेशियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ६ जून १९०१)
१९८४ : अरुण सरनाईक, महाराष्ट्रीयन मराठी चित्रपट अभिनेता व गायक. (जन्म: ४ ऑक्टोबर १९३५)
२००३ : लिऑन युरिस अमेरिकन कादंबरीकार (जन्म: ३ ऑगस्ट १९२४)
२०१२ : महाराष्ट्रीयन मराठी लेखक व अनुवादक तसचं, 'सह्याद्री' वृत्तपत्राचे संपादक भालचंद्र दत्तात्रय खेर यांचे निधन. (जन्म: १२ जून १९१७)
२०१२ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय अर्थशास्त्रज्ञ, नागरी सेवक अधिकारी आणि मुत्सद्दी तसचं, अमेरिकेतील भारताचे माजी राजदूत व माजी नियोजन आयोगाचे सदस्य आबिद हुसेन यांचे निधन.
२०१२ : भारतीय छायाचित्रकार आणि पत्रकार सुनील जना यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १९१८)
२०२० : जीत सिंग नेगी (आधुनिक घरवल लोकसंगीताचे जनक, जन्म: २ फेब्रुवारी १९२५).



रविवार दि. २१ जून २०२६ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत




# मुलांनो ! आई-वडील हेच आपले दैवत-हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

विद्यार्थी - युवक, नवीन पिढी हे समाजाचे देशाचे भावी निर्माता आहे. एकीकडे आधुनिक तंत्रज्ञान टेक्नोलॉजीच्या माध्यमाने शैक्षणिक क्षेत्रात नवीन पिढीत उन्नती, प्रगती दिसुन येते पूर्वी संयुक्त मोठे परिवार होते. आम्ही दोन आमचे दोन या अभियनामुळे कुटुंब सिमित झाले आहे. फक्त एक मुला किंवा मुली असले तरी शिक्षणासाठी मोठ्या शहरात किंवा विदेशात जावे लागते. वय झाल्यानंतर गावांत एकट्या आई- वडिलांना रहावे लागते. सुखा दुःखात त्यांचे हाल होतात. त्या मुळे त्यांना अनाथ / वृध्दा आश्रमात रहावे लागतात. ज्यांनी तुम्हाला जन्म दिले, तुमचे पालन पोषण केले, आर्थिक दृष्टी बिकट असली तरी कर्जा घेऊन, लहान-सहान शेती विकुन, संस्कार व तुम्हाला दर्जेदार शिक्षण देण्याने प्रयत्न केले आहे.

मुलांनो आई-वडील हेच आपले दैवत आहे, असे उद्गार हस्तीमल बंब यांनी काढले. प्रतिवर्षा प्रमाणे महाविर इंटरनेशनल जालना सेंटर रॉयल तर्फे ग्रामीण भागातील जामवाडी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गरजूं विद्यार्थीयांना शाळेय साहित्य, वह्या, पुस्तका, पेन-बॉलपेन, कम्पास बाक्स, पाणी बोतल इत्यादि दि. १९ जून २०२६ रोजी निःशुल्क वाटप करण्यात आले. अध्यक्ष विजयराज सुराणा प्रास्ताविक करताना महावीर



इंटरनॅशनल ही संस्था संपूर्ण देशात विदेशात मानवीय सेवेच्या रुपाने मागील ५० वर्षा पासुन कार्य करीत आहे. मागील दिवासात जालना शाखेला उत्कृष्ठ कार्याबदल पुरस्कार सुध्दा मिळालेल्या आहे. गरजूंना साहाय्य करणे हेच महावीर इंटरनेशनलचे उद्देश आहे, असे सुराणा म्हणाले. पुढे बोलताना बंब म्हणाले आत्महत्याग्रस्त शेतकरी व कोवीड मुळे निधन झालेले त्यांचे अनाथ मुला-मुलीना दत्तक घेऊन त्यांचे शिक्षणाची, राहण्याची, जेवणाची सर्व काही निःशुल्क व्यवस्था करण्यात येते. जिद-चिकाटी, लगन-अभ्यासाने यश हमखास मिळते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सदउपयोग करून दुरउपयोग टाळावा. आपल्या उज्वल भविष्यासाठी व्यसनमुक्त रहा. शहरात मोठ्या शाळेत विद्यार्थीयांना लाभ मिळू शकते पण ग्रामीण भागात गोरगरीब मुलांना मदत मिळणे अवघड आहे, त्यामुळे आम्ही या गावाच्या शाळेची मदत करण्यासाठी निवड केली आहे, असे शेवटी बंब म्हणाले. कचरुलाल पाटणी, अभय सेठीया, प्रमोद जोशी यांनी ही मनोगत व्यक्त केले. शाळेतील ५८ विद्यार्थीर्थांना लागणारे सर्व शालेय साहित्य वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मकरंद सावजी, अशोक दहातोंडे, शाळेच्या अध्यापिका उषा मुंडे, अध्यक्ष भानूदास वाढेकर, अप्पा खर्डेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाने सुत्रसंचालन सचिव देवेन्द्र सावजी यांनी केले. तर आभार शाळेची मुख्याध्यापिका सौ. रुपाली वासने यांनी मांडले. कार्यक्रमात अध्यापक वर्ग, कर्मचारी वर्ग व पालक वर्ग उपस्थित होते.

# जिल्ह्यात संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेचे अनुदान रखडल्याने लाभार्थ्यांचे हाल

## जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील संजय गांधी निराधार आणि श्रावण बाळ योजनेतील हजारो लाभार्थ्यांना गेल्या काही महिन्यांपासून अनुदानासाठी मोठी वाट पाहावी लागत आहे. सरकारी धोरणानुसार दरमहा १ ते ५ तारखेच्या आत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळीच आहे. याबाबत माँ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, एप्रिल २०२६ महिन्याचे अनुदान काही लाभार्थ्यांना मिळाले. तर अनेकांना अद्याप मिळालेले नाही. तसेच, मे २०२६ महिन्याचे अनुदान तर लाभार्थ्यांच्या खात्यावर जमाच झाले नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.या योजनेतील बहुतांश लाभार्थी हे वृद्ध, निराधार आणि दिव्यांग आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना आणि दैनंदिन गरजांसाठी त्यांना पूर्णपणे या अनुदानावर अवलंबून राहावे लागते. सध्याच्या महागाईच्या काळात वेळेवर पैसे मिळत नसल्यामुळे अनेक महिला लाभार्थ्यांना उसणवारी करून घरखर्च चालवावा लागत आहे. धोंडे जेवणासारख्या सणासुदीच्या काळातही खिशात पैसे नसल्याने त्यांना कर्ज काढून सण साजरा करावा लागल्याची हृदयद्रावक माहितीही या निवेदनात दिली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्र्यांनी विधानसभेत घोषणा केली होती की, संजय गांधी निराधार, श्रावण बाळ आणि दिव्यांग योजनेचे अनुदान दरमहा १ ते ५ तारखेच्या आत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले जाईल. मात्र, जालना जिल्ह्यात या घोषणेची अंमलबजावणी होत नसल्याने गोरगरिबांचा विश्वास डळमळीत होत आहे. अनुदान वेळेवर मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. तरी, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घ्यावी आणि सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून थकीत अनुदान तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करावे, अशी मागणी बाबासाहेब वानखेडे यांनी केली आहे.

# मोक्ष लॉजवर अड्ड्यावर छापा

जालना । प्रतिनिधी

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास मिळालेल्या गुप्त माहिती वरून बसस्टॅन्ड रोड वरील मोक्ष लॉज येथे लॉज मालक व मॅनेजर हे स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी त्यांच्या लॉज मध्ये महिलांना ठेवुन त्याच्याकडुन अनैतिक देहव्यापार करून घेत आहे वैगेर वरून सदरील दोन्ही ठिकाणी कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधिक्षक सो यांच्याशी चर्चा करन त्यांच्या आदेशाप्रमाणे अनैतिक भानयी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी व स्टाफचे अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा कारवाई केली.



रादर सार्वजनिक ठिकाणा पासुन जवळ असलेल्या बसस्थानक जवळ मोक्ष लॉज येथे संतोष जाधव व्यवसाय मॅनेजर रा. खरपुडी ता. जि. जालना ह.मु. मोक्ष लॉज जालना व २) सुभाष वैद्य वय ४० वर्ष व्यवसाय मॅनेजर रा भोकरदन नाका ता जि जालना ३) मालक सचीन नंदु पवार (फरार) वय ३० वर्ष रा. संभाजीनगर जालना है स्वतचे फायदयाकरीता बाहेरून महीलांना बोलावुन घेवुन त्यांचे कडुन देहविक्रीचा व्यवसाय करुन घेतांना व ग्राहक विशाल बावस्कर रा. शेख पुर ता सिल्लोड जि छत्रपती संभाजीनगर असे मिळुन आले त्यांच्या ताब्यातुन ०१ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आसुन त्याच्या ताब्यात १४१५/-असा मुद्देमाल रोख रक्कम व साहीत्य असे मिळुण आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे सदरबाजार येथे महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६,७ प्रमाणे अ.मा.वा.प्र. कक्ष ग्रेडपोउपनि रविंद्र जोशी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबिर सिंह संधु, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रवी जोशी, पोउपनि संजय गवळी, तसेच महिला अंमलदार संगिता चव्हाण, निमा घनघावज्योती राठोड, आरती साबळे, चित्रा चव्हाण व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.


## टीसी हरवला आहे

अक्षरा गजानन साळुंके या नावाचा बारावी पासचा टीसी अण्णभाऊ साठे चौक ते सुभाष रोड प्रवासा दरम्यान हरवला आहे सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा

संपर्क

९६५७२५५७९९



## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही.पी. पाटील, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ८३१/२०२६**

**अॅड.एस.एस. नाईकवाडे**

**रत्ना भ्र. खुशालचंद गुरखुदे व इतर वि. निरंक**

अर्जदार - १. रत्ना भ्र. खुशालचंद गुरखुदे, वय ७३ वर्षे, धंदा-घरकाम, २. तिलकचंद पि. खुशालचंद गुरखुदे, वय ४६ वर्षे, धंदा-व्यापार, ३. लालचंद पि. खुशालचंद गुरखुदे, वय ४४ वर्षे, धंदा-व्यापार, ४. राजेश पि. खुशालचंद गुरखुदे, वय ४२ वर्षे, धंदा-व्यापार, ५. संजय पि. खुशालचंद गुरखुदे, वय ३८ वर्षे, धंदा-व्यापार, ६. रमेश पि. खुशालचंद गुरखुदे, वय ३६ वर्षे, धंदा-व्यापार, वरील सर्व रा.जव्हेरी गल्ली, कारंजा रोड, बीड ता.जि.बीड

विरुध्द गैरअर्जदार

निरंक प्रकरणः- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ च्या कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी खुशालचंद रामचंद्र गुरखुदे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत खुशालचंद रामचंद्र गुरखुदे हे दिनांक ०४/१२/२०२५ रोजी बीड ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क.२ ते ६ हे मयताचे मुले आहेत. मयतास अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे खुशालचंद रामचंद्र गुरखुदे रा. जव्हेरी गल्ली, कारंजा रोड, बीड ता.जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख ०६/०८/२०२६. आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाधारित/-**
**कनिष्ठ लिपीक**

**आदेशावरून,**
**स्वाधारित/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**



## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ८६२/२०२६**

CNR No. MHBI02000015942026

**मार्फत अॅड. आर.बी. शिंदे**

**भारत दादाराव साबळे वि. निरंक**

अर्जदार :- १. भारत पि. दादाराव साबळे, वय ५४ वर्षे, धंदा मजुरी, रा. पालवण ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मालनबाई भ्र. दादाराव साबळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.ज्याअर्थी मयत मालनबाई भ्र. दादाराव साबळे यांचा मृत्यु दिनांक १३/०५/२०२४ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हा मयताचा मुलगा आहे. तसेच मयताचे पती यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत मालनबाई भ्र. दादाराव साबळे याचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यानी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कात त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी. प्रकरणातील पुढील तारीख २७/०७/२०२६ आज दिनांक १२ माहे जुन २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरुन,**
**स्वाक्षरीत**
**अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**



## जाहीर प्रगटन

**मा. श्री. श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८१९/२०२६**

**अॅड. के. डी. अवारे**

अर्जदार १) कांताबाई भ्र. विजय ससाणे, वय-६० वर्षे, धंदा-घरकाम, रा. उत्तर बाजू, बालेपीर, नगर रोड, बीड ता. जि. बीड.

विरुध्द गैरअर्जदार :

अर्जदार हे भारतीय आहेत प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे सोनाबाई भ्र. वामन मस्के यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेवायत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे सोनाबाई भ्र. वामन मस्के, य. उत्तर बाजू, बालेपीर, नगर रोड, बीड जि. बीड हे दिनांक २५/०४/२०२६ रोजी बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार ही मयताची मुलगी आहे. तसेच मयताचे आई वडील हे फार पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक २२/०७/२०२६

आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरुन,**
**अधिक्षक, दिवाणी न्यायालय,**
**व. स्तर, बीड**



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३७८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०३/०६/२०२६

नाव बदलण्याचा

## जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शामीम बेगम मैनोद्दिन सि.स.नं. ११९६ नं.प. घर नं . ८-११० चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (८-११० ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- मधुकर गोसावी यांचे घर
पश्चिम : भैय्यासाहेब देशमखची जागा
दक्षिण- नानाबाईची पाठ भिंत
उत्तरः अहमदसाब डॉक्टर यांची जागा

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**


# ऑपरेशन टायगर ऐवजी ऑपरेशन सरसकट कर्जमाफी राबवावे-आमटे



बीड। प्रतिनिधी

कर्जाच्या डोंगरपाई शेतकरी देशोधडीला लागला आहे. सरकारने कर्जमाफीची घोषणा फसवी केली आहे या फसव्या कर्जमाफी मध्ये शेतकऱ्याच्या पदरात पडणार नाही सरकारने ऑपरेशन टायगर राबवले, ऑपरेशन टी एम सी राबवले, ऑपरेशन आप राबवले, ऑपरेशन एन सी पी राबवले पण सरकारने ऑपरेशन कर्जमाफी राबवावे सरकारला खासदार फोडायला पैसे आहेत पण शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यासाठी पैसेच नाही का? सरकारने सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केली

शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड जिल्ह्यातील बऱ्हाणपूर येथे सरकारच्या फसव्या कर्जमाफी जीआरची होळी करण्यात आली या वेळी शेतकऱ्यांमध्ये फसव्या कर्जमाफी संदर्भात शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जागृती करण्यात आली. शेतकरी हक्क मोर्चा गावो गावी जाऊन सरकारच्या विरोधात फसव्या कर्जमाफी विषयी जागृती अभियान राबवत आहे बीड जिल्ह्यात मागील वर्षी अतिवृष्टी ने धुमाकूळ घातला गावची गाव अतिवृष्टी नुकसान झाले तर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा का मिळत नाही? सरकारने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पीक विमा तत्काळ देण्यात यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे,काशिनाथ लांडे, अतुल लांडे, मोहन लांडे, बन्सी कानडे, राम चिरके मच्छिंद्र लांडे, नारायण लांडे, नीलेश माने, चंद्रसेन क्षीरसागर, सुरेश लांडे, दादासाहेब लांडे, गोरख शिंदे यांनी केली


## जाहीर प्रगटन

माझे अशिल श्री. जयंत पि. लक्ष्मणराव पालवणकर, रा. बीड, यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरून, तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरून सर्व जनतेस जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे अशिलाने सुंदरकांत बन्सीधरराव कुलकर्णी यांचे मालकी व ताब्यातील मौजे पालवण, ता.जि. बीड येथील गट नं. ८५ (सध्या गट नं. ८६) मधील प्लॉट क्र. ३४, ज्याची लांबी १५ मीटर व रूंदी १० मीटर आहे, एकूण क्षेत्रफळ १५० चौ. मी. आहे, ज्याची चतुः सिमा, पुर्वेस- प्लॉट नं.३५, पश्चिमेस प्लॉट नं. ३३, दक्षिणेस प्लॉट नं. ४१, उत्तरेस - ९ मीटर रूंदीचा रस्ता, अशा आहेत.

येणे प्रमाणे चतुः सिमे अंतर्गत येणारी मिळकत, त्यामधील अनुवंशीक अधिकारासह कायम खरेदी घेण्याचा करार केलेला आहे. सदरची मिळकत ही विनाबोजा, निर्विवाद, विनातारण असल्याची व सदर मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नसल्याची ग्वाही विद्यमान मिळकत मालकांनी माझे अशिलास दिलेली आहे. तरी वरील मिळकतीबद्दल कोणालाही खरेदी, गहाण, बक्षीस, हिबानामा, मृत्युपत्र, अदलाबदलपत्र, आर्थिक स्वरूपाचा बोजा, वहिवाटी हक्क, कोर्ट डिक्री अथवा इतर कोणताही हक्क अथवा अधिकार असल्यास त्या बाबतचा लेखी आक्षेप संबंधित कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह खालील पत्त्यावर, हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसाचे आत लेखी नोंद करावा. नसता वरील मिळकतीबद्दल कोणालाही कोणत्याही प्रकारचे (सुप्त देखील) अधिकार नाहीत आणि माझ्या अशिलाच्या व्यवहार करण्यास आक्षेप नाही, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर कोणाचाही, कोणताही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

**बीड**
**दिनांक : २०-०६-२०२६**
**मार्फतःॲड .ए.ए. हसेगावकर,बीड**
**मो.नं. ९८८१०३२२९५**

**जाहीर प्रगटन देणार**
**श्री. जयंत पि. लक्ष्मणराव पालवणकर**



## जाहीर प्रगटन

माझे अशिल श्री. अभय पि. लक्ष्मणराव पालवणकर, रा. बीड, यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरून, तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरून सर्व जनतेस जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे अशिलाने रोहिणी रमेशराव कुलकर्णी यांचे मालकी व ताब्यातील मौजे पालवण, ता. जि. बीड येथील गट नं.८५ (सध्या गट नं. ८६) मधील प्लॉट क्र.२, ज्याची लांबी १५ मीटर व रूंदी १० मीटर आहे, एकूण क्षेत्रफळ १५० चौ. मी. आहे, ज्याची चतुःसिमा, पुर्वेस- प्लॉट नं. १६, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ३, उत्तरेस प्लॉट नं. १, अशा आहेत.

येणे प्रमाणे चतुःसिमे अंतर्गत येणारी मिळकत, त्यामधील अनुवंशीक अधिकारासह कायम खरेदी घेण्याचा करार केलेला आहे. सदरची मिळकत ही विनाबोजा, निर्विवाद, विनातारण असल्याची व सदर मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नसल्याची ग्वाही विद्यमान मिळकत मालकांनी माझे अशिलास दिलेली आहे. तरी वरील मिळकतीबद्दल कोणालाही खरेदी, गहाण, बक्षीस, हिबानामा, मृत्युपत्र, अदलाबदलपत्र, आर्थिक स्वरूपाचा बोजा, वहिवाटी हक्क, कोर्ट डिक्री अथवा इतर कोणताही हक्क अथवा अधिकार असल्यास त्या बाबतचा लेखी आक्षेप संबंधित कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह खालील पत्त्यावर, हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसाचे आत लेखी नोंद करावा. नसता वरील मिळकतीबद्दल कोणालाही कोणत्याही प्रकारचे (सुप्त देखील) अधिकार नाहीत आणि माझ्या अशिलाच्या व्यवहार करण्यास आक्षेप नाही, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर कोणाचाही, कोणताही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

**बीड**
**दिनांक : २०-०६-२०२६**
**अॅड.ए.ए. हसेगावकर, बीड**
**मो.नं. ९८८१०३२२९५**

**जाहीर प्रगटन देणार**
**श्री. अभय पि. लक्ष्मणराव पालवणकर**



## जाहीर प्रगटन

माझे अशिल श्री. आल्हाद पि. लक्ष्मणराव पालवणकर, रा. बीड, यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरून, तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरून सर्व जनतेस जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे अशिलाने जगदिश भास्करराव राऊतमारे यांचे मालकी व ताब्यातील मौजे पालवण, ता.जि. बीड येथील गट नं. ८५ (सध्या गट नं. ८६) मधील प्लॉट क्र. ३३, ज्याची लांबी १५ मीटर व रूंदी १० मीटर आहे, एकूण क्षेत्रफळ १५० चौ.मी. आहे, ज्याची चतुः सिमा, पुर्वेस- प्लॉट नं. ३४, पश्चिमेस प्लॉट नं. ३२, दक्षिणेस प्लॉट नं. ४०, उत्तरेस-९ मीटर रूंदीचा रस्ता, अशा आहेत.येणे प्रमाणे चतुः सिमे अंतर्गत येणारी मिळकत, त्यामधील अनुवंशीक अधिकारासह कायम खरेदी घेण्याचा करार केलेला आहे. सदरची मिळकत ही विनाबोजा, निर्विवाद, विनातारण असल्याची व सदर मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नसल्याची ग्वाही विद्यमान मिळकत मालकांनी माझे अशिलास दिलेली आहे. तरी वरील मिळकतीबद्दल कोणालाही खरेदी, गहाण, बक्षीस, हिबानामा, मृत्युपत्र, अदलाबदलपत्र, आर्थिक स्वरूपाचा बोजा, वहिवाटी हक्क, कोर्ट डिक्री अथवा इतर कोणताही हक्क अथवा अधिकार असल्यास त्या बाबतचा लेखी आक्षेप संबंधित कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह खालील पत्त्यावर, हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसाचे आत लेखी नोंद करावा. नसता वरील मिळकतीबद्दल कोणालाही कोणत्याही प्रकारचे (सुप्त देखील) अधिकार नाहीत आणि माझ्या अशिलाच्या व्यवहार करण्यास आक्षेप नाही, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर कोणाचाही, कोणताही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

**बीड**
**दिनांक : २०-०६-२०२६**
**अॅड .ए.ए. हसेगावकर, बीड**
**मो.नं. ९८८१०३२२९५**

**जाहीर प्रगटन देणार**
**श्री. आल्हाद पि. लक्ष्मणराव पालवणकर**

# गेवराई प्रमाणेच आष्टी तालुक्यात वाळू माफिया सुसाट

## आ.पंडित तहसीलदाराची तक्रार करतात मग आ.सुरेश धस गप्प का?

आष्टी । शरद रेडकर

गेवराई तालुक्यामध्ये कोट्यावधी रुपयांचा वाळू घोटाळा झाला या प्रकरणी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी तहसीलदार संदीप खोमणे यांच्याविरुद्ध थेट जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार केली या प्रकरणाचे सपोर्ट चौकशी सुरू आहे मात्र असाच प्रकार आष्टी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाळूउपसा होत आहे तरी स्थानिक आ सुरेश धस गप्प का आहेत हा सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न पडला आहे.

आष्टी तालुक्यातील नदी पात्र परीसरात अवैध वाळु उपसा मोठ्या प्रमाणावर होत आहे याला स्थानिक प्रशासन जबाबदार असून ते मूग पिळून गप्प आहेत





तालुक्यातील सांगवी आष्टी,खडकत, शितपुर,नागलवाडी, देवी गव्हाण तलाव परिसर टाकळशिंग, या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा होत आहे तहसील प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांची मुख संमती आहे गेवराई तालुक्यामध्ये जवळपास १०० कोटीपेक्षा अधिक वाळूचा घोटाळा झाला आहे घरकुलधारकांना देण्यात येणाऱ्या पाच ब्रास वाळूचा देखील आभार तहसीलदार खोमणे यांनी केला होता याचा स्पॉट कंचनाला आमदार विजयसिंह पंडित यांनी केल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे रिझल्ट या प्रकरणी अनेकांना नोटिसाकडून काही कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात आले मात्र संदीप खोमणे यांना यातून का वगळण्यात आले त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदार खोमणे यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला वाळूचे गंभीर प्रकार असताना प्रशासन मात्र झोपेतून घेत आहे आष्टी पाटोदा आणि शिरूर तिने तालुक्यातून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाळू उपसा होत आहे ती तालुक्यात तर वाळू माफियांनी घातला असून याला तहसीलदार व त्यांचे प्रशासन मुखसंती देत आहे स्थानिक आमदार सुरेश धस मात्र यावर काहीच बोलत नाहीत त्यामुळे आपल्या मतदारसंघांमध्ये वाळू माफियांचा होत असलेला ठोसळात पाहता विजय सिंह पंडित यांनी तहसीलदाराविरुद्ध केलेली तक्रार पाहतात आमदार गप्प का आहेत याविषयी तालुक्यात चवीने चर्चा सुरू आहे .

### महसूल आणि पोलिसांचा आशीर्वाद

तालुक्यामध्ये कोणत्याच ठिकाणी वाळू घाटाला परवानगी नसतानाही मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा केला जात आहे वाळू माफियांचा सुरू असलेला आहे त्यांना तालुका तहसील आणि पोलीस प्रशासनाचे भांडवल असल्याचे दिसते अनेक वेळा दातागिरीही सर्वसामान्य नागरिकांना सहन करावी लागते मात्र प्रशासन याकडे डोळे झाक करते

# आ. प्रसाद लाड संविधान आणि कायद्यापेक्षा मोठे आहेत काय? - अ‍ॅड. सुभाष राऊत

बीड । प्रतिनिधी

बोगस नोंदीच्या आधारे घेतलेले कुणबी प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने रद्द केल्यानंतरही आ. प्रसाद लाड हे त्या नोंदीसाठी प्रशासनावर दबाव टाकत असल्याची चित्रफीत समोर आली आहे. कायद्याने स्थापित झालेल्या संवैधानिक समितीच्या निर्णयानंतर देखील आ. लाड असा दबाव आणत असतील तर ते स्वतःला संविधान आणि कायद्यापेक्षा मोठे समजत आहेत का? असा सवाल महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांनी केला आहे.

माजलगाव येथील एका नगरसेविकेचे बोगस नोंदीच्या आधारे काढलेले कुणबी प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने रद्द केले आहे. त्यानंतर त्याच नोंदीच्या संदर्भाने त्या नोंदी अधिकृत ठरवण्यासाठी आ. प्रसाद लाड प्रशासनावर दबाव टाकत असल्याची चित्रफीत समोर आली आहे. जात पडताळणी समितीने एखादी नोंद बोगस ठरविल्यानंतर त्याला पुन्हा अधिकृत ठरविण्याचा आटापिटा आ. लाड का करत आहेत? असा सवाल आता समता परिषदेचे ड. सुभाष राऊत यांनी केला आहे. आ. प्रसाद लाड हे संवैधानिक यंत्रणांमध्ये हस्तक्षेप करून त्यांच्यावर दबाव आणत आहेत, संवैधानिक पदाची शपथ घेतलेल्या व्यक्तीला हे शोभते का? ओबीसींमध्ये बोगस नोंदीच्या आधारे घुसखोरीला आ. लाड प्रोत्साहन का देत आहेत? ते स्वतःला संविधान आणि कायद्यापेक्षा मोठे समजतात का? एकीकडे भाजप आपला डीएनए ओबीसी असल्याचे सांगते आणि त्यांचेच आमदार ओबीसींमध्ये बोगस घुसखोरीला पाठबळ देत आहेत. आपण याची तक्रार मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचेही ड.सुभाष राऊत यांनी म्हटले आहे.

# माजलगावच्या प्रभाग क्रमांक एकच्या नगरसेविका रेखा आंबुरे-सरोदे यांचे कुणबी जातीचे प्रमाणपत्र ठरले अवैध

माजलगाव । प्रतिनिधी

गतवर्षी पार पडलेल्या माजलगाव नगर पालिका निवडणुकीमध्ये ओबीसीसाठी आरक्षीत जागेवर मराठा कुणबी जात प्रमाणपत्राच्या आधारे निवडणुक लढवून विजयी झालेल्या रेखा आंबुरे-सरोदे यांच्या कुणबी जात प्रमाणपत्रावर पराभूत उमेदवार सुमनबाई मुंडे यांनी आक्षेप घेतला होता.या प्रकरणी सुनावणी होवून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून कुणबी जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर हे प्रमाणपत्र जप्त करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी यांना दिल्याने रेखा आंबुरे-सरोदे यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे.



माजलगाव तालुक्यातील खळवट लिंबगाव येथील मुळ रहिवासी रेखा अंकुशराव आंबुरे, सासरचे नाव रेखा प्रल्हादराव सरवदे यांनी इतर मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध करत इतर मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या वार्डातून माजलगाव नगर पालिका निवडणुक लढवली.या निवडणुकीत त्यांचा विजय झाला. त्यांच्या विरोधात उभ्या असलेल्या सुमनबाई मुंडे यांनी रेखा आंबुरे-सरोदे यांच्या असलेले कुणबी जातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याची तक्रार जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे केली होती.या अर्जावर आणि पुराव्यावर सखोल सुनावणी झाली.जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयानुसार रेखा अंकुशराव आंबुरे-सरोदे यांच्या कुणबी जातीचा दावा नियमानुसार अमान्य करण्यात आला आहे.त्यांचे कुणबी प्रमाणपत्र उपविभागीय अधिकारी यांना जप्त करण्याचे आदेश पारित करण्यात आले. सदर निर्णय जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, सदस्य उमेश सोनवणे,सदस्य सचिव श्रावस्ती मिश्राम यांच्या त्रिसदस्यीय समितीने एकमताने कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय दिला. पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि माजलगावचे मुख्याधिकारी यांना अधिकृत प्रत पाठवून दिली. तक्रारदाराच्या वतीने अ‍ॅड. विकास मिसाळ यांनी काम पाहिले तर त्यांना अ‍ॅड. दीपक कुलकर्णी, अ‍ॅड. उदय दराडे यांनी सहकार्य केले. रेखा आंबुरे-सरोदे यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्यामुळे त्यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे.

# आदित्य कृषी महाविद्यालयात पर्यावरण दिन उत्साहात; वृक्षारोपण व संवर्धनाचा संकल्प!

बीड । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी महाविद्यालयात वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. केवळ नवीन झाडे लावण्यापुरते मर्यादित न राहता, महाविद्यालय परिसरातील जुन्या वृक्षांचे संगोपन व संरक्षण करण्याचा एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या सोतब प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगवायचेच',अशी सामूहिक शपथ विद्यार्थ्यांनी घेतली.



प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगवायचेच', विद्यार्थ्यांनी घेतली सामूहिक शपथ

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. शाम भूतडा यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. ◀◀ पान ३ वर

# नगर नाका चौक ते संत सेवालाल महाराज चौक दरम्यान रस्त्यावर जागोजागी खड्डे!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील दळणवळणासाठी उपयुक्त असलेल्या कॅनॉल रस्त्यावर नगर नाका चौक ते संत सेवालाल महाराज चौक दरम्यान जागोजागी खड्डे पडले असून यामुळे नागरिकांना आपली दुचाकी चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या खड्ड्यांमुळे पाऊस पडल्यानंतर अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.



पावसाळ्याआधी हा रस्ता दुरुस्त करून जागोजागी पडलेले खड्डे बुजवण्यात यावेत अशी मागणी डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर समर्थक संजय धुरंधरे यांनी केली आहे.

कॅनॉल रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली आहे. जागोजागी खड्डे आणि रस्त्याच्या मधोमध उभा असलेल्या विद्युत खांबांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कॅनॉल रस्त्याचा वापर दळणवळणासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो. या रस्त्यालगत विविध शाळा, कॉलेज, खाजगी दवाखाने, भाजीपाला आणि फळांचे मार्केट आहे. दळणवळणासाठी आणि खरेदीसाठी या रस्त्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. मात्र हा मुख्य रस्ता आता विविध समस्येने ग्रासला असून रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. यामुळे नागरिकांना खडतड प्रवास करत अडचणीला सामोरे जावे लागत आहे. याकडे नगरपालिका प्रशासनाने वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे. अपघात होण्यापूर्वीच ◀◀ पान ३ वर

# रोटरीचा चंपावती भूषण पुरस्कार महादेव महाराज चाकरवाडीकर यांना; सेवा गौरव पुरस्कार रामकृष्ण रंधवे बापूंना प्रदान

बीड । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला चंपावती भूषण पुरस्कार व सेवा गौरव पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. समाजप्रबोधन, अध्यात्म, संस्कार संवर्धन आणि मानवसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत यावर्षीचा चंपावती भूषण पुरस्कार ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांना तर सेवा गौरव पुरस्कार ह.भ.प. रामकृष्ण रंधवे (बापू) महाराज यांना प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीर लातुरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच पीडीजी रो. हरीश मोटवानी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह, पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रो. इंजी. राहुल बोरा यांनी समाजात निःस्वार्थ भावनेने अध्यात्म, संस्कार, समाजप्रबोधन आणि मानवसेवेचे कार्य




करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी आणि समाजात सेवाभाव वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने हे पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे सांगितले.

यावेळी मार्गदर्शन करताना डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीर लातुरे यांनी रोटरी ही केवळ सेवा संस्था नसून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणारी जागतिक चळवळ असल्याचे सांगितले. अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवा जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करून रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनने समाजासमोर एक आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकासासाठी रोटरीचे कार्य अधिक व्यापक करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सत्काराला उत्तर देताना ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर ◀◀ पान ३ वर

# माळी समाज विद्यार्थी गुणगौरव सोहळा

बीड । प्रतिनिधी

माळी समाज कर्मचारी सेवा संघाच्या वतीने बीड येथील संत सावता महाराज मंदिर सभागृहात रविवारी आयोजित करण्यात आलेल्या गुणगौरव व करिअर मार्गदर्शन सोहळ्यात दहावी, बारावी परीक्षेत ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळविलेल्या तसेच विविध स्पर्धा व शैक्षणिक परीक्षांत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

बीड जिल्ह्यातील माळी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय राऊत, आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरक्षनाथ तरटे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तुषार लगड, पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक मोहन क्षिरसागर, महसूल सहाय्यक अधिकारी उज्ज्वला राऊत उपस्थित होते. तर शैक्षणिक समुपदेशक अभिजित दूधाळ आणि प्रल्हाद खेत्रे यांनी करिअर मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करताना मान्यवरांनी माळी समाज




हा कष्टाळू, मेहनती आणि प्रामाणिक समाज असल्याचे सांगितले. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा आदर्श ठेवून विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या बळावर प्रशासकीय सेवेत अधिकाधिक स्थान ◀◀ पान ३ वर


# पाऊस गायब झाल्याने शेतकरी हावालदिल

## एल निनोचा खरीप हंगामावर मोठा परिणाम; माजलगाव धरणातील जलसाठा २१% टक्के

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

जून महिन्याचा जवळपास अर्धा कालावधी संपत आला असतानाही मौसमी समाधानकारक पाऊस न झाल्याने तालुक्यासह परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले असुन दुबार पेरणीच्या संकटाने हावालदिल झाले आहेत तर माजलगाव धरणातील पाणीसाठाही अत्यल्प पातळीवर आला आहे. एकीकडे पावसाने ओढ दिली,तर दुसरीकडे एल निनोच्या प्रभावामुळे मॉन्सूनचा वेग मंदावल्याने शेतकऱ्यांच्या आशा मावळू लागल्या आहेत.

यावर्षी वेळेवर पाऊस पडेल,या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी बियाणे,खते आणि मशागतीची तयारी पूर्ण केली आहे. मात्र, पावसा अभावी शेतात पेरणीची कामे सुरू होऊ



शकलेली नाहीत.जूनच्या पहिल्या पंधरवड्यात साधारणतः मोठ्या प्रमाणात पेरण्या पूर्ण होत असतात. यंदा मात्र अनेक ठिकाणी शेतजमिनी कोरड्याच असून, पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.माजलगाव धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनण्याची शक्यता आहे. धरणाच्या जलसाठ्यावर अवलंबून असलेल्या अनेक गावांमध्ये भविष्यात पाणीटंचाईची भीती निर्माण होण्याची शक्यता आहे

एल-निनोच्या प्रभावामुळे मॉन्सूनचे आगमन विस्कळित होण्याची शक्यता असते.त्यामुळे पावसात खंड पडून खरीप हंगामावर परिणाम होऊ शकतो.वेळेवर पाऊस न झाल्यास सोयाबीन,कापूस, तूर,मूग आणि उडीद यांसारख्या पिकांच्या पेरण्या आणखी लांबण्याची शक्यता आहे.

**माजलगाव धरणाची सद्यःस्थिती**

**पाणीपातळी : ४२७.८३ मीटर**

**एकूण पाणीसाठा : २१०.५० दलघमी**

**उपयुक्त पाणीसाठाः ६८.५० दलघमी**

**टक्केवारी : २१.९६%**

### काही भागांत दुबार पेरणीचे संकट

माजलगाव तालुक्यातील लवुळसह अनेक गावात मागील सात दिवसांपासुन दोन तीन दिवस सारखा पाउस झाल्याने बहुतांशी शेतकऱ्यांनी या पावसावर खरिपातील कापूस, तूर, सोयाबीन आदी पिकांची लागवड केली परंतु आता पावसाची उघडीप झाल्याने मात्र या शेतक-यांवर आता पुन्हा पेरणी करण्याचे संकट ओढावले असुन त्यांच्या खर्चात वाढ होणार आहे.

# तत्कालीन बिडिओ सुर्यवंशी गैरव्यवहार व नियमबाह्य निधीचे वाटप आरोपातून दोषमुक्त

बीड । प्रतिनिधी

पंचायत समिती शिरूर येथे गटविकास अधिकारी पदावर कार्यरत असताना बी.के. सुर्यवंशी यांना शौचालय अनुदान वाटपात अनियमिता व गैरव्यवहार गुन्हा दाखल करण्यात आला होता. अधिकाराचा गैरवापर करून नियमबाह्य बाह्य निधीचे वाटप केले, असा ठपका ठेवून जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करून अन्याय केला होता. याप्रकरणी सुर्यवंशी यांनी उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. न्यायालयाने सूर्यवंशी याच्यावरील आरोप खारीश त्यांना दोषमुक्त केले आहे. यामुळे तत्कालीन अधिकाऱ्यांना चपराक बसली आहे.

जिल्हा परिषदेचे तात्कालिक कार्यरत असणारे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छ विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ढोकणे जुन्या वादाचा बदला घेण्यासाठी निलंबनाची कारवाई करून पोलीस ठाण्यात खोटा गुन्हा दाखल करून मला मानसिक त्रास दिला, असे सुर्यवंशी यांनी म्हटले आहे. या प्रकरणात उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद यांनी २५ जूलै २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार तालुका न्याय दंडाधिकारी न्यायालयात तालूका न्यायालयाने या केसमधून वगळण्याचे नाव वगळण्याचे आदेश ३ जून २०२६ रोजी पारीत केले आहेत. या निकालामुळे तत्कालीन अधिकाऱ्यांना मोठी चपराक बसली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26